गुरुवार, १६ मे २०२४

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २५७

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 16 MAY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-257 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05



दैनिक आधुनिक केसरीचे लोकप्रिय यू-ट्यूब चॅनल घेऊन येत आहे...




आपल्या मुला-मुलींच्या विविध प्रतिभा व कलागुणांना वाव देणारी विशेष स्पर्धा

आपल्या मुला-मुलींचे गाणे, नृत्य, चित्र काढताना, रांगोळी रेखाटताना, विविध कसरती, वाद्ये वाजवताना, नकला, अभिनय किंवा कोणत्याही गुणांचे सादरीकरण करतानाचा व्हिडिओ आमच्याकडे पाठवा. ज्या तीन व्हिडिओंना सर्वाधिक व्ह्यूज आणि लाइक्स मिळतील ते ठरतील...

वयोमर्यादा 3 ते 17 वर्षे

आधुनिक केसरी पुरस्कृत महाराष्ट्राचे उगवते तारे

चला तर, सज्ज होऊया आणि आपल्या बालकांची प्रतिभा जगाला दाखवूया!

अधिक माहितीसाठी संपर्क : 9075716739/ 9168365235

: व्हिडिओ पाठवताना कोणती काळजी घ्यावी :

1. व्हिडिओमध्ये स्वतःचा सविस्तर परिचय (नाव, पत्ता) आणि विषय सांगावा. 2. व्हिडिओ बनवताना मोबाइल आडवा पकडावा. 3. व्हिडिओमध्ये स्पर्धकाशिवाय इतर कसलाही गोंधळ, गर्दीचा आवाज येणार नाही याची काळजी घ्यावी. 4. व्हिडिओ पाठवताना WHATSAPP डॉक्युमेंटमध्ये पाठवावा. 5. स्पर्धकाचा चेहरा व्यवस्थित दिसेल याची काळजी घ्यावी.

93093 94123 या नंबरवर व्हिडिओ पाठवणे


# न्यूज क्लिकच्या संपादकांची अटक अवैध

## सर्वोच्च न्यायालय : दिल्ली पोलिसांनी यूएपीएअंतर्गत केली होती अटक

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने न्यूज क्लिकचे संपादक प्रबीर पुरकायस्थ यांना बुधवारी मोठा दिलासा देत त्यांच्या सुटकेचे आदेश दिले आहेत. प्रबीर पुरकायस्थ यांच्यावर काही दिवसांपूर्वी यूएपीए अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर त्यांना दिल्ली पोलिसांकडून अटक करण्यात आली होती. दिल्ली पोलिसांनी यूएपीए अंतर्गत केलेल्या कारवाईला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती.**

या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडल्यानंतर बुधवारी न्यूजक्लिकचे संपादक प्रबीर पुरकायस्थ यांना न्यायालयाने सोडण्याचे आदेश दिले. न्यूजक्लिक या वृत्त संकेतस्थळाने चीनकडून बेकायदा निधी घेतल्याचा आरोप आहे. तसेच चिनी प्रचारासाठी न्यूजक्लिकला कोट्यवधी रुपयांचा विदेशी निधी मिळाल्याचा आरोप आरोपपत्रात करण्यात आला होता. हा निधी अमेरिकेच्या मार्गाने पुरवण्यात आल्याचे एफआयआरमध्ये नमूद करण्यात आले होते.

बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्याच्या (यूएपीए) विविध कलमांअंतर्गत प्रबीर पुरकायस्थ यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात गेल्या वर्षी पुरकायस्थ यांना दिल्ली पोलिसांकडून अटक झाली होती. दरम्यान आता



सर्वोच्च न्यायालयासमोर झालेल्या सुनावणीवेळी न्यूजक्लिकच्या संस्थापकाची अटक आणि त्यानंतर त्यांना झालेली कोठडी बेकायदेशीर असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

रिमांडपूर्वी अटकेचे कारण त्यांना किंवा त्यांच्या वकिलांना सांगितले नव्हते, असे निरिक्षण न्यायालयाचे नोंदवले आहे. दरम्यान, यूएपीए प्रकरणात न्यूजक्लिकचे संपादक प्रबीर पुरकायस्थ यांना सोडण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावर अर्शदीप खुराना यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने अटक आणि रिमांडची कार्यवाही बेकायदेशीर ठरवली आहे. प्रबीर पुरकायस्थ यांच्या सुटकेचे निर्देश दिले आहेत. आता ट्रायल कोर्टासमोर जामीनपत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी हा मोठा दिलासा आहे. कारण आम्ही सुरुवातीपासूनच त्याच्याविरुद्ध झालेली कार्यवाही ही बेकायदेशीर असल्याचे म्हटलो होतो. तसेच अटक करण्याची पद्धत बेकायदेशीर होती, हे आता सर्वोच्च न्यायालयानेही म्हटले आहे.

# चंद्रपुरात अतिक्रमण विरोधात महानगरपालिकेची मोठी कारवाई



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शहरात रस्त्यावर अतिक्रमण करून व्यवसाय थाटणाऱ्या अतिक्रमणधारकांवर चंद्रपूर महानगरपालिकची कारवाई सुरूच असुन आज अंचलेश्वर गेट ते गिरनार चौक ते गांधी चौक ते मिलन चौक ते अभय टॉकीज तसेच गोलबाजार येथे फूटपाथ / नालीवरील मोठ्या प्रमाणातील अतिक्रमण शहर पोलीस स्टेशन व वाहतूक पोलिस विभागाशी समन्वय साधुन काढण्यात आले. शहरातील विविध भागात मनपाद्वारे अतिक्रमण निर्मुलन मोहीम मागील काही दिवसांपासुन सातत्याने सुरु असुन अंचलेश्वर गेट,गिरनार चौक,गांधी चौक, मिलन चौक,अभय टॉकीज परिसर,गोलबाजार या परिसरातील अतिक्रमण मोठ्या प्रमाणात काढुन रस्ते मोकळे करण्यात आले आहे. फुटपाथवर केली पक्के बांधकाम, दुकानांसमोरील बांधकाम केलेले रॅम्प,कच्चे व पक्के शेड तोडण्यात आले आहे व फुटपाथवर ठेवण्यात आलेले साहित्य सुद्धा जप्त करण्यात आले आहे. गोलबाजारात खरेदीदारांची गर्दी असते,मात्र दुकानदारांच्या अतिक्रमणामुळे पायी चालणाऱ्याला सुद्धा मार्ग काढणे कठीण जाते. आजच्या कारवाईत अश्या रस्त्यावर अनधिकृतरीत्या आलेल्या दुकानदारांचे अतिक्रमण काढण्यात आले आहे.

# धोकादायक, अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई करा


## आ. किशोर जोरगेवार यांची जिल्हाधिकारी यांना सूचना

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** जिल्हात अनेक धोकादायक आणि अवैद्य होर्डिंग्ज आहेत. यामुळे आता धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. अशात सदर होर्डिंग्जवर कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा यांना केल्या आहे. सदर निवेदनही आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने जिल्हाधिकारी विनय गौडा यांना पाठविण्यात आले आहे.


चंद्रपूर जिल्हातील अनेक ठिकाणी धोकादायक आणि अनधिकृत होर्डिंग्ज अस्तित्वात आहे. हे होर्डिंग्ज नागरिकांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहे, काही दिवसापासून अवकाळी पाऊस व वादळवारे सुरु असून येत्या काही दिवसात मान्सून हंगा-मात वादळवार्यामुळे त्या कधीही खाली पडू शकतात आणि गंभीर दुखापत किंवा जीवितहानीस कारणीभूत ठरू शकतात. याव्यतिरिक्त, ते शहराचं विद्रुपीकरण करण्यास कारणीभूत आहे. मागील काही दिवसापूर्वी मुंबई मनपा भागातील घाटकोपर येथे धोकादायक होर्डिंग कोसळल्याने मोठी जीवितहानी झाली आहे. त्याच पार्श्वभूमीवर चंद्रपूर येथे सुद्धा सदर घटनेची पुनरावृत्ती होण्यापासून टाळण्यासाठी आधीच उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच शासनच्या परवानगी न घेता व स्ट्रक्चरल ऑडिट न करता मनमानी प्रकाराने शहरात अनेक अनधिकृत होर्डिंग्ज उभारण्यात आलेल्या आहे, आणि त्यापण नागरिकांच्या दृष्टीने धोकादायक असून शहराचे विद्रुपीकरण होत आहे. ही बाब लक्षात घेता चंद्रपूर शहरातील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने जिल्हातील सर्व होर्डिंग्ज चे स्ट्रक्चरल ऑडिट करून धोकादायक होर्डिंग व अनधिकृत होर्डिंग्ज तातडीने हटविण्याच्या सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


प्राध्यापक लक्ष्मण देशपांडे यांचं ' वऱ्हाड निघालं लंडनला ' हा एकपात्री प्रयोग बहुतेकांनी पाहिला असेल किंवा त्याचा ऑडिओ तरी ऐकला असेल. त्याची आठवण येण्याचं कारण म्हणजे डिसेंबर ( २०२३ ) महिन्यात आम्हाला एका लग्नाला जायचं होतं. ते लग्न होतं कर्नाटकात होस्पेट या गावी. तसं म्हटलं तर लग्नाला जाणं आवश्यक होतं . पण त्याआधी त्यांच्या साखरपुड्याला आणि कर्नाटकातील शिमोगा या सारख्या लांबच्या गावी हजर राहिल्यानं लग्नाला हजर नसतो राहिलो तरी ते चालून जाण्यासारखं होतं असा सोयीस्कर विचार आम्ही केला. पण आमच्या सौभाग्यवतीच्या आग्रहापुढे आमचा हा न जाण्याचा विचार फारसा टिकला नाही. ( अर्थात असं होणार याची मनोमन खात्री होतीच. देवानं माणसाला आणि प्राण्यांना सुद्धा जो सिक्स्थ सेन्स ( मराठीत काय म्हणतात माहिती नाही ) दिला आहे, तो प्राण्यांकडे तर आहे पण माणूस निसर्गापासून दूर गेल्याने तो ही मौल्यवान गोष्ट हरवून बसला आहे. पण समस्त नवरे मंडळींना मात्र अशा प्रकारचा सिक्स्थ सेन्स निसर्गानं अजूनही ठेवला आहे. त्यामुळेच पुढचे धोके लक्षात येतात. तर असो. तुम्हाला म्हणून सांगितलं ) त्याआधी शिमोग्याला जाण्याचा अनुभव गाठीशी होता. चाळीसगावहून शिमोग्याला जाण्यासाठी डायरेक्ट कुठलीही गाडी नव्हती. चाळीसगावहून कारने जाण्याचा विचार केला पण लांबचा पल्ला असल्याने तोही विचार रद्द केला.




## हितगुज



पुष्प ६५वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## वैष्णव जन तो तेने कहिये

राष्ट्रपिता महात्मा गांधी, संत नरसी मेहतांचे भजन नित्य प्रार्थनेत म्हणत असत. ते लोकप्रिय भजन आहे - 'वैष्णव जन तो तेने कहिए, जो पीड पराई जाने रे।' या भजनांतून संत नरसी मेहतांनी वैष्णव व्यक्तित्त्वाचे गुण विशद केले आहेत. दुसर्याचे दुःख जाणून त्याबद्दल कळवळा असणारा, त्याला मदत करणारा, उपकार करतांना किंचित ही अभिमान न बाळगणारा, कोणाची कधीही निंदा न करणारा, सर्व लोकांमध्ये सन्मान प्राप्त असून सर्वांना आदर देणारा, वचन, मन, कर्माने दृढ, कपटरहित, समानता बाळगणारा, सत्यप्रिय, सत्यवचनी, परधनाची किंचितही इच्छा नसलेला, मोह-मायादि विकारांच्या प्रभावाने मुक्त, दृढ वैराग्य धारण केलेला, रामनामात रंगलेला, त्याच्या शरीरात सर्व तीर्थ सामावली आहेत असा पावन, अशा गुणधर्माचा 'वैष्णव' नरसी मेहतांनी वर्णिला आहे. अशा व्यक्तिमत्त्वाचे दर्शन देखील तारणारे असते. त्यांची संगती उच्च परिवर्तन घडवते असे सांगून नरसी मेहतांनी एका उच्च, चारित्र्य संपन्न, उदात्त व्यक्तिमत्वाचा आदर्श समाजासमोर उभा केला आहे. असा 'माणूस' महात्मा गांधींची महत्त्वाकांक्षा होती. त्यांनी दिलेली एकादश तत्त्वे या गुणधर्माची वेगळी नावे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शुद्ध नैतिक, चारित्र्य-संपन्न सत्तेवर आधारित लोकशाही म्हणजेच जनतेची स्थापित सार्वभौम सत्ता, हेच ईश्वरीय राज्य किंवा रामराज्य होय, हे रामराज्य वर्गरहित, स्वातंत्र्य, समानता, न्याय, बंधुत्वाचे एकत्रित स्वरूप, श्रमप्रतिष्ठेचे, त्यागाने, साधेपणाने विकसित झालेले राज्य आहे. आदर्श समाजाचे ते साकार स्वरूप आहे. त्याला महात्मा गांधींनी 'पंचायती-राज्य' ही म्हटले आहे. सत्य, अहिंसा, शील यावर आधारित पंचायती-राज्यात कुणीही गरीब नसेल, कुणी धनाढ्य नसेल. सर्व खेडी सुखी, समृद्ध व स्वयंपूर्ण असतील, तेथे लालसा, लालच नसेल तर सेवा व औदार्य असेल, अशा आदर्श समाज निर्मितीचा ध्यास महात्मा गांधींनी घेतला होता. हाच ध्यास संतांनी तळमळीने व्यक्त केला आहे. संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानात मागितलेला प्रसाद हाच आहे. प्रत्येक भारतीयांच्या मनामध्ये वैयक्तिक स्तरावर उमललेले हे सुंदर, आश्वासक, प्रेरक असे भविष्य-स्वप्न आहे. अशा आदर्श समाज-निर्मितीची आकांक्षा लोकमनाच्या उत्कृष्ट भावनांचे, त्यात प्रतिबिंबित झालेल्या भारतीय सत्त्वाचे अभिव्यक्त स्वरूप आहे. विकासाच्या गतीमान प्रक्रियेत या आकांक्षेला समावून घेता येईल; विराट लोकसंख्येच्या देशातील मनुष्यबळाचा कल्याणकारी उपयोग करून घेता येईल, 'माणूसपण' अधिक शक्तीवान बनवून प्रगतीची क्षितीजे गाठण्याचा प्रयत्न होईल, तेव्हा खर्या अर्थाने आम्ही प्रगत पुरोगामी, विकसित आहोत, असे म्हणता येईल. अवघा 'माणूस' एक होऊन सर्वकल्याणाच्या दिशेने आपापल्या परीने सहभाग देत जेव्हा आयुष्याची सार्थक वाटचाल अनुभवेल तेव्हा 'सुजलां-सुफलां' वास्तवात येईल. प्रत्येकाची राष्ट्रोत्कर्षात भागीदारी ध्येयनिष्ठ बनवण्यासाठी आता महात्मा गांधींनी दर्शवलेल्या अध्यात्माची गरज या देशाला आहे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## श्री साईबाबा

आधुनिक केसरी

"श्रीगजानन विजय" या ग्रथात छापल्या अभिप्रायमध्ये बा. ग. खापर्डे यांनी लिहिले आहे की त्यांना त्याचे वडिल दादासाहेब खापर्डे



यांनी सांगितले होते की श्रीगजानन महाराजांनी ज्या दिवशी देह ठेविला त्या दिवशी श्रीसाईबाबा दिवसभर शोक करीत होते. ज्याक्षणी श्रीगजानन बुवांचे देहावसान झाले त्यावेळी श्रीसाईबाबा गडाबडा लोळले आणि "माझा जीव चालला, मोठा जीव चालला" असे विव्हळून अनेकदा ओरडले.
संत बाहेरून जरी वेगवेगळे दिसत असेल तरी अंतरंगातून ते एकत्र मिसळलेले असतात यात शंका नाही. साईनिर्वाणाची कथा सर्वांना माहित आहे म्हणून त्यातील फक्त काही महत्वाच्या घडामोडींचा येथे विचार करत आहोत. १) साईनिर्वाणः १५/१०/१९१८. वेळः २.३५ मी. २) २८ सप्टेंबर पासून बाबांना ताप आला. ३) सकाळी ९ किंवा १० चा दरम्यान वीट दुभंगली. ४) बायजा बाईंच्या अंगावर प्राण सोडले. ५) नाना साहेबांनी पाण्याची झारीने पाणी पाजले पण पाणी बाहेर आले. त्यासरशी "देवा" म्हणून मोट्याने किंचाळी मारली.
६) हिंदु मुस्लिम वाद झाला हिंदू म्हणायचे बाबाना वाड्यात त्यांच्या अंतिम ईच्छेप्रमाणे समाधी द्या तर मुस्लिम त्यांना बाहेर समाधीस्त करून थडके बांधून आम्ही व्यवस्था पाहू. ७) काही हिंदू म्हणत बाबानी देह द्वारकामाईत ठेवला तेथेच समाधी बांधा. ८) नगरहून काकासाहेबांनी कलेव्टर बोलावले. ९) सर्वानी आपले मत कागदावर लिहावे, ज्यांचे जास्त त्याप्रमाणे निर्णय होईल. म्हणून रामचंद्र कोतेंनी कंबर कसली व गावातून वाड्यात समाधी द्यावी यासाठी २००० मते मिळाली व प्रती पक्षाला ५००/६०० च मते मिळाली आणि बाबांचा देह वाड्यात ठेवावा असा ठराव मंजूर झाला. १०) "त्यानंतर "उपासनी महाराजांनी" सशास्त्र पद्धतीने साई बाबांचा सर्व अंतिम संस्कार विधी पार पाडला. ११) २७ ओक्टो. १९१८ ला तेरावे बापुसाहेब जोग व उपासनी महाराज यांनी गंगेसारख्था पवित्र ठिकाणी केले. त्यासाठी भंडारा वर्गणी २४०० रू जमली.
१२) बाबां नंतर त्यांच्या सर्व वस्तू ज्यांची किंमत १०,००० चा आसपास होती ते जतन करायला शिर्डी ट्रस्टची स्थापना झाली.
१३) पहिले वर्षश्राद्ध काशीमध्ये उपासनी बाबानी व बापुसाहेब जोग यांनी केले. तेथे मोठ्या स्वरूपात अन्नदान, गोदान, सब्राम्हण दक्षिणा देऊन हा सोहळा पार पडला.
श्रीसाईबाबांचा जन्म केव्हा, कुठे झाला हे अजूनही अज्ञात आहे. त्यांचे गुरु, आई, वडिल, त्यांची परंपरा याबद्दल काहीही माहीती उपलब्ध नाही. जेव्हापासून ते प्रकट झाले तेव्हापासून ६०-६५ वर्षे ते शिर्डीलाच होते. त्यांनी स्वतःबद्दल कोणाला काही सांगितले नाही. आणि काही लिहूनही ठेवले नाही. श्रीसाईबाबांचे चरीत्र म्हणजे एकमेव श्री साईसच्चरित ही पोथी होय. या पोथीचे लेखक हेमाडपंत म्हणजेच श्री. गो. द. दाभोळकर हे आहेत. ही पोथी सर्व साई भक्तांमध्ये अतिशय लोकप्रिय आहे.



आधुनिक केसरी

### अंतःचक्षु पाहु | रूप तुझे ||


निषीदिनी आम्हा | एकचि हा ध्यास ||
लाभावा निवास | तुझे पायी ||१||
क्षणोक्षणी घेऊ | नाम विठ्ठलाचे ||
वेड किर्तनाचे | लागो मना ||२||
सत्कर्माची जाण | आमुचे वैभव ||
विकार सदैव | जळो देवा ||३||
नको आम्हा काही | मान धन देऊ ||
दास तुझे होऊ | जन्मोजन्मी ||४||
ब्रह्मरस सेवु | ब्रह्मानंदी राहु ||
अंतःचक्षु पाहु | रूप तुझे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

चाह गई चिन्ता गई, आश वासना नाश ।
जिवन मृत्यू जेहि खेल है, अस सुख सन्त निवास ।।३१।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल पंचम अध्याय) ०४/०५/३१
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
त्या परमानंदाची प्राप्ती झाल्यावर सर्व इच्छांचा नाश होतो; कामनांचा नाश झाल्यावर चिंता, आशा आणि वासनांचा ही समूळ विनाश होतो. जीवन आणि स्वतःचे मरण ज्यांच्यासाठी एक खेळ आहे अशा संतांना असे उत्तम सुख, परमानंद प्राप्त झाल्याने होते. संतांचा चेतन निवास अमृत पूर्ण परमानंद आहे, ज्याची प्राप्ती झाल्यावर जीवन आणि मरण त्यांच्या अधिन होतात.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

..........................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## परमात्म्यावर पूर्ण निष्ठा पाहिजे

आधुनिक केसरी



आईकरिता रडत असलेले मूल आई भेटल्याशिवाय रडणे थांबवत नाही, त्याप्रमाणे, समाधानाकरिता, आनंदाकरिता, धडपडणारा आपला जीव, परमेश्वर प्राप्त झाल्याशिवाय शांत राहू शकत नाही. म्हणून प्रपंचाची काळजी न करता, परमेश्वराची प्राप्ती कशी होईल याची काळजी करा. भगवंतावर संपूर्णपणे निष्ठा ठेवल्याशिवाय आपली प्रपंचाची काळजी दूर होणार नाही. सर्व जगताचा जो पालनकर्ता, तो आपले पालन नाही का करणार ? प्रत्येक गोष्ट त्याच्याच सत्तेने होते हे लक्षात ठेवा, मग प्रपंच कधीही बाधक होणार नाही. एक भगवंतावरची निष्ठा मात्र शेवटच्या श्वासापर्यंत सांभाळा. आपण पुराणात वाचलेच आहे की, भीष्माने पांडवांना मारण्याची प्रतिज्ञा केली. भीष्मप्रतिज्ञाच ती, मग ती खोटी कशी होऊ शकेल? सर्व पांडव चिंताग्रस्त झाले, पण द्रौपदीची निष्ठा मात्र जबरदस्त होती. ती म्हणाली, "आपण श्रीकृष्णाला विचारू." तिने सर्व वृत्तांत त्याला कथन केला. श्रीकृष्ण म्हणाला, "भीष्माची प्रतिज्ञा खोटी कशी होईल ? तरी आपण एक प्रयत्न करून बघू." तो म्हणाला, "द्रौपदी, तू आता असे कर, रात्री भीष्माचार्यांच्या आश्रमात जा. तिथे फक्त संन्याशांना आणि स्त्रियांना मुभा आहे. मी तुझ्याबरोबर आश्रमापर्यंत येतो." त्यानंतर श्रीकृष्ण द्रौपदीला घेऊन भीष्माचार्यांच्या आश्रमापर्यंत गेले आणि बाहेरच तिचे अलंकार आणि इतर वस्तू सांभाळत बसले. श्रीकृष्णांनी तिला आत जाताना सांगितले की, "भीष्माचार्य आता झोपत आहेत, अशा वेळी तू आत जा आणि बांगड्या वाजवून नमस्कार कर." त्याप्रमाणे द्रौपदी आत गेली, आणि बांगड्या वाजवून भीष्माचार्यांना तिने नमस्कार केला. त्यांनी लगेच तिला "अखंड सौभाग्यवती भव" म्हणून आशीर्वाद दिला. मग त्यांनी पाहिले तो द्रौपदी ! तेव्हा ते म्हणाले, "द्रौपदी ही अक्कल तुझी खचित नव्हे; तुझ्याबरोबर कोण आहे ते सांग." ती म्हणाली, "माझ्याबरोबर गडी आणला आहे; तो बाहेर उभा आहे." भीष्माचार्यांनी बाहेर येऊन पाहिले. त्यांनी श्रीकृष्णाला ओळखले, परंतु आता सर्व काम होऊन चुकले होते. म्हणून म्हणतो, परमात्म्यावर पूर्ण निष्ठा पाहिजे. या निष्ठेच्या आड जर काही येत असेल तर तो म्हणजे आपला अभिमान.
हा अभिमान सर्वांना घातक आहे. तो घालवण्यासाठीच परमात्म्याला वारंवार अवतार घेणे भाग पडले. ही अभिमानाची हरळी नाहीशी व्हायला भगवंताच्या नामासारखा दुसरा उपाय नाही. नामावर प्रह्लादाने जशी निष्ठा ठेवली तशी ठेवावी. त्याने नाम श्रद्धेने घेतले आणि निर्विषय होण्याकरिता घेतले, आपण ते विषयासाठी घेऊ नये. नामापरते दुसरे सत्य नाही हे समजावे. याच जन्मात हे नाम शांतीचा आणि समाधानाचा ठेवा मिळवून देईल.
७३. नामस्मरणात स्त्रीपुरूष, श्रीमंतगरीब, हे भेद नाहीत. फक्त ते श्रद्धेने घेणे जरूर आहे.

## विकल्पनिरसन



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

वेद, शास्त्रे ,थोर अनुभव घेणारी संतमंडळी उदा. ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज, शेगावीची राणा गजानन महाराज,व आपण आत्तापर्यंत अभ्यासत असलेला दासबोध याभूमीवर जे जे लोक की ते समाजाला दिशा दाखवण्याचे काम करत आहेत त्यांना आत्मज्ञानाने जन्ममरण संपते हे मान्य होणार नाही.

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, १६ मे २०२४

adhunikkesari.com




# शेकडो भाविक भक्तांच्या साक्षीने रेणुका माता यात्रा महोत्सव संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील रेणुका माता यात्रा महोत्सवची शेकडो भाविक भक्तांच्या साक्षिने संपन्न झाली. पाच दिवस पंचमी महोत्सव तर तद्नंतर २०-२५दिवस यात्रा महोत्सव सुरु होता. यात्रा ना ना म्हणता बऱ्यापैकी सुरू होती.यंदा सिनेमा थेयटर तमाशा फड आले नाही तर अर्धे दुकानदार पोहचले नाही. मात्र जे व्यापारी व्यावसायिक पोहचले त्यांचा चांगला व्यवसाय होवून कमाई झाली. परंतु हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.तर यात्रेचे सर्व विधीवत कार्य मोठ्या उत्साहात करण्यात आले.बाजारसावंगी पंचक्रोशी बरोबरच जिल्हा भर महाराष्ट्रातून भाविक भक्त महोत्सवात सहभागी झाले होते. शेवटी २०-२५ दिवसांनंतर शेकडो भाविक भक्तांच्या साक्षिने रेणुका माता यात्रा महोत्सव संपन्न झाले. तर तालुक्यातील वेरुळ म्हैसमाळ खुलताबाद वडोद पाडळी कानडगाव मंहमदपूर कनकशीळ येसगाव नं एक, दोन, तीन येथील यात्रा महोत्सव ही संपन्न झाले.तालुका भर मे/ जूनपर्यंत धामधुम असते व भाविक भक्त याचा लाभ घेतातच हे विशेष.

# अजित सोनवणे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** निरा ता.पुरंदर येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी अजित सोनवणे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य पदी निवड करण्यात आलेली आहे. या निवडीबद्दल अजित सोनवणे यांचे सर्वच स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.अजित सोनवणे हे राष्ट्रवादी पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष म्हणून काम करत होते.त्यांच्या कामाची दखल राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी घेतली व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मान्यतेतून व राष्ट्रवादी प्रदेश युवक अध्यक्ष सुरज दादा चव्हाण यांनी पत्र देऊन निवड केली. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अमर पाटील हे उपस्थित होते. या निवडीनंतर राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, युवक अध्यक्ष सचिन गुटकुले, पुणे मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष दिगंबरजी दुर्गाडे,जिल्हा नियोजन समितीचे सदस्य विराज भैया काकडे तालुकाध्यक्ष उत्तमराव धुमाळ,तालुका युवक अध्यक्ष अमित झेंडे, विधानसभा अध्यक्ष तालुका वामन जगताप, गणेश जगताप, अनिल चव्हाण, राजेश चव्हाण, तनुजा शहा, आदेश गिरमे, शहराध्यक्ष प्रमोद काकडे, संतोष मोहिते, अल्पसंख्यांक



तालुकाध्यक्ष नदीम सय्यद, अक्षय चव्हाण, जयदीप पवार,ओमकार लकडे, मीडिया अध्यक्ष तालुका तेजपाल सणस, कार्याध्यक्ष अभय थोपटे, अनिकेत सोनवणे, विराज जमदाडे,अजय राऊत आदींनी अजित सोनवणे यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. अजित सोनवणे गेली अनेक वर्षांपासून अजित पवार यांचा आदेश मानून काम करत असतात.अजित पवार यांचा एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून अजित सोनवणे यांच्या कडे पाहिले जाते. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बारामती लोकसभा मतदारसंघात अजित सोनवणे यांनी विशेष प्रचार यंत्रणा राबविली होती. निरेसह आस पासच्या पंचक्रोशीतून तसेच पुरंदर तालुक्यातून अजित सोनवणे हे पक्षासाठी काम करत असून प्रत्येक दिवशी प्रचारात त्यांचा सहभाग दिसुन येत होता.अजित पवार यांच्या शी प्रामाणिकपणे एकनिष्ठ राहत असताना प्रत्येक दिवशी अजित पवार यांचे कार्य हे प्रचारात सांगण्याचा प्रयत्न अजित सोनवणे करीत होते.अजित सोनवणे यांच्या कार्याची दखल घेत आज त्यांना प्रदेश स्तरांवर सदस्य पदी नेमण्यात आल्याने अजित सोनावणे यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे राष्ट्रवादी प्रदेश युवक अध्यक्ष सुरज चव्हाण यांचे विशेष आभार मानलेले आहेत. पक्षाने दिलेली जबाबदारी यापुढेही एकनिष्ठतेने पार पाडणार असल्याचे अजित सोनवणे यांनी म्हटलेले आहे.

# गरिबांच्या पोटाची तमा बाळगता महानगरपालिकेची हुकूमशाही

## काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष रितेश (रामू) तिवारी यांची मनपा आयुक्तांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्यासाठी चंद्रपूर महानगरपालिका, पोलीस विभाग आणि वाहतूक पोलीस विभागाने संयुक्त कारवाई सुरू केली आहे. या कारवाईमध्ये शहरातील अनेक गरीब व छोट्या व्यावसायिकांचे अतिक्रमण हटवण्यात आले आहे. परंतु, मोठ्या बिल्डरचे अवैध बांधकाम न तोडता केवळ गरीब कष्टकरी लोकांचे रस्त्यावरील छोटे व्यवसाय हटविण्यात आले आहेत. यावर चंद्रपूर शहर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रितेश (रामू) तिवारी यांनी या कारवाईवर तीव्र टीका केली आहे. "पावसाळा जवळ येत असताना महानगरपालिकेने ही कारवाई तात्काळ थांबवून पावसाळी उपाययोजनांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे.", अशी मागणी केली आहे. चंद्रपूर शहरामध्ये मोठ्या प्रमाणात अवैध, बांधकाम पार्किंग नसलेले बांधकाम आहेत. मात्र,केवळ गरीब लोकांचेच अतिक्रमण अशा हुकूमशाही पद्धतीने काढण्यात येत आहे. रितेश (रामू) तिवारी यांनी आरोप केला आहे की, महानगरपालिका आयुक्त विपिन पालीवाल गरीब लोकांच्यावर अत्याचार करत आहेत. पालीवाल हे केवळ गरीब लोकांचे अतिक्रमण हटवत आहेत, तर श्रीमंत लोकांचे अतिक्रमण आणि अवैध बांधकाम काढण्याकडे दुर्लक्ष करत आहेत. महानगर पालिकेच्या या कारवाईमुळे सर्वसामान्य व्यवसायिकांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. या कारवाईमध्ये अनेक दुकानाचे बोर्ड, दुचाकी वाहन, विक्रेत्यांचे रस्त्यावर ठेवलेले ट्रॉली, अनेक दुकानदारांचे फुटपाथवर ठेवण्यात आलेले साहित्य जप्त करण्यात आले आहे. पत्र्याचे शेड अतिक्रमण जेसीबीद्वारे काढण्यात आले आहे. महानगरपालिकेने अतिक्रमण हटवण्याच्या कारवाईमुळे अनेक गरीब व्यवसायिकांवर परिणाम होत आहे. अनेक गरीब कष्टकरी लोकांचे रस्त्यावरील छोटे व्यवसाय उघड्यावर आले आहेत. गरीब व्यवसायिकावर होणारा हा अन्याय खपवून घेणार नाही, असा इशारा देखील रितेश तिवारी यांनी दिला आहे.

# जुनं फर्निचर चित्रपट बघून ज्येष्ठ नागरिकांच्या डोळ्यात तरळले पाणी

## ज्येष्ठ नागरिकांना आमदार किशोर जोरगेवार यांनी दाखविला जुनं फर्निचर चित्रपट

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जेष्ठ नागरिकांच्या समस्यांवर आधारित जुनं फर्निचर या सिनेमाचा शो आमदार किशोर जोरगेवार यांनी वयोवृध्द नागरिकांना दाखविला. यावेळी अम्मा सह सहपरिवार या शो चा आमदार किशोर जोरगेवार यांनी आनंद घेतला. जेष्ठ नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी आज आपण 250 जेष्ठ नागरिकांना हा सिनेमा दाखविला असल्याचे ते यावेळी म्हणाले. हा सिनेमा बघून जेष्ठांच्या डोळ्यात पाणी तरडले. आ. किशोर जोरगेवार हे नेहमी अभिनव उपक्रम राबवित समाजामध्ये सक्रियरित्या काम करत असतांचे अनेक उदाहरणे आजवर समोर आली आहे. यापूर्वी विविध क्षेत्रात कार्यरत जेष्ठ गुरुंचा त्यांनी सत्कार केला होता. ज्येष्ठ नागरिक संघ सर्व सोयी सुविधायुक्त करण्यासाठी मोठा निधी त्यांच्या वतीने शहरातील 7 ज्येष्ठ नागरिक संघाला उपलब्ध करुन दिला आहे. दरम्यान त्यांनी मिराज सिनेमागृह येथे जुनं फर्निचर या सिनेमाचा दुपारचा पूर्ण शो शहरातील जेष्ठ नागरिकांसाठी बुक केला होता. यावेळी शहरातील रामनगर जेष्ठ नागरिक संघ, चैतन्य जेष्ठ नागरिक संघ, स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ, विश्रांती ज्येष्ठ नागरिक संघ, विठ्ठल रुखमाई जेष्ठ नागरिक संघ, प्रबुध्द जेष्ठ नागरिक संघ, पसायदान जेष्ठ नागरिक संघ या जेष्ठ नागरिक संघातील जेष्ठांना सदर सिनेमासाठी आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने आमंत्रित करण्यात आले होते. दुपारी 4 वाजता



**वडिल आणि मुलांना एकत्रित सिनेमा पाहण्याची संधी :** वस्तुस्थितीवर आधारीत सिनेमा दाखविल्याबदल जेष्ठांनी आमदार किशोर जोरगेवार यांचे आभार मानले . सोबतच आमच्या पाल्यांनाही हा सिनेमा आपण दाखवावा अशी आग्रही विनंती केली . त्यानंतर रविवारी पून्हा एकदा सदर सिनेमाचा एक शो आमदार किशोर जोरगेवार यांनी बुक केला असुन सदर शो मध्ये वडिल आणि मुलाला प्रवेश दिल्या जाणार आहे . त्यामुळे वडील आणि मुलाला एकत्रीत हा सिनेमा पाहण्याची संधी उपलब्ध झाली आहे .
**95 वर्षीय चंद्रमोर्य राजापूर यांनी घेतला चित्रपटाचा लाभ :** आमदार किशोर जोरगेवार यांनी आयोजित केलेल्या जुना फर्निचर हा सिनेमा बघण्यासाठी 10 किलोमिटरच्या अंतरावरुन 95 वर्षीय चंद्रमोर्य राजापूर हे सिनेमागृहात पोहोचले होते . यावेळी त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला .

मिराज सिनेमागृहात सिनेमाला सुरुवात झाली.

जवळपास 250 जेष्ठ नागरिकांनी यावेळी सदर सिनेमाचा लाभ घेतला. यावेळी आमदार किशोर जोरगेवार सह सहपरिवार सिनेमाला उपस्थितीत होते. पारिवारीक, सामाजिक जीवन जगत असतांना ज्येष्ठ नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असतो. नकळत अनेक चुका होत असतात. ज्या मुलांना बोट धरुन आपण मोठ करतो तेच शेवटच्या वळणार आई वडिलांना सोडून देतात. त्यानंतर त्यांच्यावर येणारे संकट मोठे असते. आपण आज वयोवृध्द नागरिकांना घेऊन हा सिनेमा पाहिला. वयोवृध्दांना म्हातार वयात सन्मानाने जगता याव ही शिकवण देणारा हा सिनेमा होता. असे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. सिनेमा बघून निघाल्यानंतर जेष्ठांच्या भावना त्यांच्या चेहऱ्यावर उमटून दिसत होता.

# रोहित पवारांचे टीकास्त्र !

आधुनिक केसरी

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ बुधवारी नाशिकमधील पिंपळगाव बसवंत येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. मात्र, या सभेपूर्वी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आल्याचे पुढे आलं आहे. तसेच कांदा उत्पादक शेतकरी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना नोटीसही बजावण्यात आली आहे. यावरून शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी शिंदे सरकारवर टीका केली आहे. रोहित पवार यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. पंतप्रधान मोदी नाशिकमध्ये येणार आहेत म्हणून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना नोटीस दिली जात आहे. काहींना तर अटकही करण्यात आली आहे. खरं तर निर्विवाद सत्ता उपभोगणाऱ्यांनी शेतकरी हिताचे निर्णय घेतले असते, तर कदाचित ही वेळ आली नसती, अशी प्रतिक्रिया रोहित पवार यांनी दिली. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात हिंमत असेल, तर त्यांनी कांद्याची माळ घालून पंतप्रधान मोदी यांचे स्वागत करावे, असे आव्हानही दिले. पुढे बोलताना, राज्यातील नेते फुसका बार आहेत, तर पंतप्रधान मोदी यांची कांद्याच्या प्रश्नापासून दूर पळण्याची इच्छा आहे. मात्र, महाराष्ट्रातील उध्वस्त झालेला शेतकरी बघून पंतप्रधान मोदी यांचा टेलेप्रोम्प्टर तरी कांद्याबद्दल एखादा शब्द बोलेल ही अपेक्षा आहे, असा टोलाही त्यांनी लगावला. विशेष म्हणजे देशात कांद्याचे सर्वाधिक उत्पादन होणाऱ्या नाशिक जिल्ह्यात पंतप्रधान मोदी यांची सभा होत आहे. जवळपास पाच महिने लागू असणारी कांदा निर्यात बंदी काही दिवसांपूर्वी सशर्त शिथील करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात कांदा निर्यात बंदीमुळे झालेले नुकसान हा कळीचा मुद्दा ठरला आहे. त्यामुळे पंतप्रधान मोदींच्या सभेदरम्यान अनुचित प्रकार घडू नये, यासाठी नाशिक ग्रामीण आणि शहर पोलिसांनी बंदोबस्त तैनात केला आहे. सभास्थळी काळे कपडे परिधान करून वा कांदा घेऊन कुणी प्रवेश करणार नाही, याकडे विशेष लक्ष दिले जाणार असल्याचे सांगितले जात आहे. मंगळवारी महाविकास आघाडीच्या काही पदाधिकाऱ्यांनी 'कांद्याने केला वांदा, चला मोदींना जाब विचारुया' असा संदेश समाजमाध्यमांत प्रसारित केल्याने कार्यकर्त्यांची धरपकड करीत त्यांना नजरकैदेत ठेवल्याचे सांगितले जाते आहे.

# चाबहार: एका दगडात दोन पक्षी



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**भारताने इराणमधील चाब बंदराच्या सर्वांगिण विकासासाठी २५० दशलक्ष डॉलर्सचे आर्थिक सहाय्य देऊ केले आहे. इराणवर निर्बंध घालणाऱ्या अमेरिकेला आणि पाकिस्तानच्या उंटावर बसून आशियाच्या तंबूत शिरणाऱ्या चीनलाही प्रतिशह दिला आहे. आता हा श्रीरामाचा बाण एकाचवेळी दोन स्पर्धकांना लक्ष्य करण्यात यशस्वी ठरला आहे. भारत आणि इराण यांच्यातील सांस्कृतिक संबंधाची प्राचीन पार्श्वभूमी आहे. कारण आर्य प्रथमतः इराणमध्ये आमोदर्या व सरदर्या या नद्यांकाठी रहात असत. तेथून ते हिंदुस्थानात आले असा सिद्धांत आहे. त्यामुळे इराणमधील सध्याचे लोकजीवन आणि सरकार हे नेहमी भारताच्या बाजूने असते.**

त्याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. इराण आणि पाकिस्तानमध्ये आडवा विस्तू जात नाही. त्यांचे विळ्या-भोपळ्याचे सख्य प्रसिद्ध आहे. चीनने पाकिस्तानशी अधिक घट्ट मैत्री केली आणि त्याच्या ग्वादर या बंदरावर ताबा मिळविला. तेथे नाविक दल उभारून आशिया खंडावर आपले प्रभुत्व गाजविण्याचे इमले बांधले. त्यामुळे चीनचा धोका लक्षात घेऊन भारताने इराणमधील चाबहार या बंदराचा विकास करण्याचे ठरविले. त्यासाठी भारताचे जहाजबांधणी मंत्री सर्वानंद सोनुवाल यांनी इराणला भेट दिली आणि भारत - इराण दरम्यानच्या चाबहार बंदराच्या विकासासाठी दहा वर्षांचा करार संपन्न झाला आहे. या कराराचे भूराजनैतिक मूल्य अनन्य साधारण आहे. कारण हा करार चाबहार बंदराच्या सर्वांगिण विकासाची हमी देणारा करार आहे. चाबहार बंदरामध्ये एकूण दहा धक्के असून या धक्क्यांचे व्यापारी व आर्थिक मूल्य अनन्य साधारण आहे. या बंदराच्या आधारे हिंद महासागर क्षेत्रातील अनेक देशांशी आर्थिक, व्यापारी आणि राजनैतिक संबंध प्रस्थापित करता येऊ शकतात. चीनच्या वाढत्या महत्त्वाकांक्षांना प्रतिशह देण्यासाठी म्हणून भारताने चाबहार बंदराची योजकतेने निवड केली आहे. चीन अलिकडे वन बेल्ट वन वर्ल्ड या व्यापारी कराराचा ढोल बडवित आहे. परंतु गेल्या तीन वर्षात चीनच्या समर्थक देशांची संख्या सातत्याने घटत आहे. चीनला प्रतिशह देण्यासाठी भारताने केलेली ही योजना अनन्य साधारण महत्त्वाची आहे.

सोमवारी सोनुवाल यांनी भारताच्या वतीने या करारावर दहा वर्षाच्या कालावधीसाठी केलेला करार हा महत्त्वाचा आहे. त्यामुळे या दीर्घकालीन कराराचे हिंद महासागर क्षेत्रातील आणि विशेषतः ओमानच्या आखातातील आर्थिक संबंधाला धोरणात्मक सुविधेचा आधार देण्याचे कार्य त्यामुळे शक्य झाले आहे. या बंदराच्या आसपासच्या भागात पायाभूत सुविधांचा संपूर्ण विकास करण्यासाठी भारताने २५० दशलक्ष डॉलर्स एवढ्या किंमतीची गुंतवणूक करण्याचे ठरविले आहे. विशेषतः या पद्धतीची पतसुविधा भारताने इराणसाठी मुद्दाम देऊ केली आहे. त्यामुळे भारत-इराण यांच्यातील बहुआयामी संबंध अधिक मजबूत होणार असून या बंदराच्या सर्वांगिण विकासाला नवी गती लाभणार आहे. या प्रसंगी भारताचे मंत्री सर्वानंद सोनुवाल यांनी मांडलेले मत अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते, या नवीन करारामुळे भारत आणि इराण या दोन्ही देशातील आर्थिक व व्यापारी संबंध अधिक दृढ होत आहेत.

चाबहारमध्ये भारताच्या धोरणामुळे दीर्घकालीन सहभाग व सौहार्दपूर्ण सहकार्याच्यादृष्टीने एक नवा पाया घातला गेला आहे. सामाजिक व आर्थिक संबंधाप्रमाणेच व्यापारी संबंधालासुद्धा त्यामुळे एक नवी बैठक लाभली आहे. या बंदराच्या विकासामुळे भारताचे सागरी सामर्थ्य अधिक मजबूत झाले आहे आणि शिवाय भारताच्या आशिया खंडातील सत्ता समतोलाच्या राजकारणालासुद्धा नवे महत्त्व प्राप्त झाले आहे. व्यूहरचनात्मकदृष्टीने भारताने पाकिस्तानला आणि चीनला दोघांनाही प्रतिशह देण्याचा हा एक चांगला प्रयत्न केला आहे. कारण चाबहार हे बंदर चीनच्या ताब्यात असलेल्या पाकिस्तानातील ग्वादर या बंदरापासून १८० किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे चीनच्या सर्व हालचालींची टेहळणी करणे भारताला शक्य होणार आहे. चीन जर भारतावर आक्रमण करीत असेल तर सागरी मार्गाने चीनला प्रतिशह देणे हे अत्यंत आवश्यक आहे. कारण जमिनीवरील हल्ल्याला सागरी मार्गाने प्रतिशह देण्यात भारताची ताकद मोठी आहे. चीनच्या नाविक दलापेक्षा भारताचे नाविक दल अधिक शक्तीशाली, अधिक सामर्थ्यवान, अधिक सरस आणि अधिक आक्रमक व बलशाली आहे. त्यामुळेच चाबहार बंदराचा विकास म्हणजे भारताने चीनला दिलेला मोठा प्रतिशह आहे असेच म्हणावे लागेल.

पश्चिम आणि मध्य आशियातील बदलत्या राजकारणात भारत आता सक्रिय झाला आहे आणि कुठल्याही क्षणी चीनला प्रतिशह देण्यासाठी भारत समर्थ आहे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवून दिले आहे. निवडणुकीच्या धामधुमीतसुद्धा सत्तेच्या राजकारणापेक्षाही देशाचे हित महत्त्वाचे आहे हे लक्षात घेऊन पंतप्रधानांनी मोठ्या जागरूकपणे हा करार कृतीमध्ये आणला ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. भारताच्यादृष्टीने सध्याच्या राजकारणापेक्षाही मध्य व दक्षिण आशियाचे हित हे महत्त्वाचे आहे. चीन, मालदीव, श्रीलंका, नेपाळ या भागात हातपाय पसरवत असताना त्याच्या विस्तारवादी, लाल साम्राज्यवादी, वसाहतवादी धोरणाला प्रतिशह देण्यासाठी भारताने योग्य ती पावले टाकली पाहिजेत यादृष्टीने चाबहार बंदरामध्ये नाविक सामर्थ्य, सागरी सामर्थ्य व लष्करी सामर्थ्य वाढविण्यासाठी केलेला दहा वर्षाचा करार म्हणजे भारताच्या वाढत्या प्रभुत्वाची साक्ष होय असे म्हणावे लागेल.

चाबहार बंदराच्या विकासाचे विशेष आणि अनन्य साधारण महत्त्व का आहे, कसे आहे हेही समजावून घेतले पाहिजे. याचा अर्थ असा होतो की, हा करार अनेकदृष्टीने भारताला पथ्यकर व लाभदायक ठरणारा आहे. पाकिस्तानकडे कराची आणि ग्वादर ही दोन बंदरे हुकमी पान आहेत. त्यातल्या त्यात पाकिस्तानने ग्वादर या बंदरामध्ये चीनचा शिरकाव करण्यास मुभा दिली. एकीकडे ग्वादरमध्ये चीनने गुंतवणूक वाढविली आणि शिवाय एक सागरी केंद्र म्हणून लष्करी शक्तीही तेथे वाढविली. या चीनच्या लष्करी हालचालींचा परिणाम भारताच्या संरक्षण व्यवस्थेवर होऊ शकतो हे लक्षात घेऊन भारताने चाबहारच्या विकासासाठी नवा मार्ग खुला केला आहे. विशेषतः त्यामुळे इराण, अफगाणिस्तान आणि ओमानच्या आखातातील सर्व देशांशी भारताचा व्यापार चांगल्या पद्धतीने होऊ शकेल. या आर्थिक तरतूदीपेक्षाही त्याचे संरक्षणदृष्टीने महत्त्व अनन्य साधारण आहे. भारताच्या आर्थिक व व्यापारी हितसंबंधापेक्षाही भूराजनैतिकदृष्टीने चाबहार बंदरातील भारताचे अस्तित्व महत्त्वाचे आहे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. हा दहा वर्षाचा करार म्हणजे एक नवे युग आहे, एक नवे पर्व आहे असे म्हणावे लागेल.

चाबहार बंदराचा विकास म्हणजे एक नवा अध्याय आहे. विशेषतः एका दगडात अमेरिका आणि चीन या दोहोंनाही गार करण्याचे सामर्थ्य या निर्णयाने सिद्ध केले आहे. कारण अमेरिकेने इराणवर आर्थिक निर्बंध लादले आहेत आणि त्याला एकाकी पाडले आहे. परंतु भारताने अशा परिस्थितीतही इराणला मदतीचा हात देऊ केला आहे. मध्य व दक्षिण आशियातील भारताच्या वाढत्या प्रभुत्वाची ही एक पावती आहे आणि विशेषतः भारत त्यामुळे जगातील पाचवी नव्हे तर तिसरी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येण्याच्यादृष्टीने हे बंदर भारताच्या ताब्यात असणे म्हणजे एक नवी आर्थिक कलाटणी आहे असे म्हणावे लागेल. या करारामुळे आर्थिक व्यापाराप्रमाणेच पश्चिम आशियातील सर्व देशांशी भारताचा व्यापार वाढीस लागेल त्यामुळे भारतातील अन्नधान्य, फळे, भाजीपाला इत्यादी कृषी मालाची निर्यात वाढेल आणि भारतीय शेतकऱ्यांचे आर्थिक सामर्थ्य वाढेल. शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करण्याच्यादृष्टीने कृषी मालास जागतिक बाजारपेठ मिळवून देणे अपरिहार्य झालेले आहे. या बंदराच्या मार्गाने होणाऱ्या आर्थिक हालचालीचे आणखी एक महत्त्व म्हणजे कोविडनंतर बिघडलेली अन्न पुरवठा साखळी मजबूत होईल, आशिया व आफ्रिकन देशांना भारताचा कृषी माल सहजपणे उपलब्ध होऊ शकेली. दूध, फळे, भाजीपाला यांच्या निर्यातीसही यामुळे गती लाभेल. भारतातील शेती व उद्योगाप्रमाणेच शैक्षणिक विकासालासुद्धा नवा हातभार लाभू शकेल. अशा प्रकारे आर्थिक निर्बंध लादण्यात आलेल्या इराणला मदत करून भारताने त्याच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय भारत व पश्चिम आशिया दरम्यान असलेल्या संबंधांना नवी गती देणारा ठरू शकेल. मैत्रीचा हा नवा अध्याय नवा सेतू बांधणारा आहे यात शंका नाही. भारताने इराणशी केलेला हा करार म्हणजे दक्षिण व पश्चिम आशियातील भारताच्या वाढत्या प्रभुत्वाची अनोखी छाप दर्शविणारा आहे. या करारामुळे दोन्ही दिशातील मैत्री तर वाढली आहेच परंतु त्या शिवायही प्रगतीचा एक नवा टप्पा त्यामुळे गाठण्यात आला आहे. भारत नाविक व आरमारी सामर्थ्याचा विचार करता, जगातील एक प्रमुख महासत्ता म्हणून उदयास येत आहे. या आर्थिक शक्ती स्रोतांचे विस्तारीकरण करताना इराणचा हा नवा चेहरा भारतामुळे अधिक प्रकाशमान झाला आहे. या बंदरामुळे सर्व आखाती देशांना भारतीय शेती माल, फळे, भाजीपाल याची उपलब्धी होईल आणि शेतकऱ्याचे उत्पन्न वाढीस लागेल. अशा या बहुआयामी करारामुळे भारताने चीन व अमेरिका या दोन्ही महासत्तांना जबरदस्त प्रतिशह दिला आहे. एका दगडामध्ये दोन पक्ष्यांचे लक्ष्य एकाचवेळी गाठले आहे. हा श्रीरामाचा बाण आहे, अर्जुनाचा नेम आहे आणि त्यामागे 'कृणवन्तो विश्वम् आर्यम्' सारे जग आर्यमय करू असा विश्वासही आहे.

# आंबेडकरी चळवळीत प्राण पेरणारा महाकवी वामनदादा



भीमराव सरवदे
संपर्क : ९४०५४६६४४१

आधुनिक केसरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी चळवळीची प्रचार आणि प्रसाराची शास्त्रयुक्त धुरा सांभाळणारा खराखुरा भाष्यकार म्हणून सर्वप्रथम नाव समोर येते ते लोककवी वामनदादा कर्डक यांचे. सामान्य माणसापर्यंत वामनदादांनी आंबेडकरी तत्त्वज्ञान पोहचवण्याचे महान कार्य केलेले आहे. ते केवळ गीतरचना करून थांबले नाहीत तर आपल्या पहाडी आवाजाने या लोकगीतांना साजशृंगार चढवून त्यांनी मरगळलेल्या आंबेडकरी चळवळीत प्राण पेरला आहे. त्यांच्या पश्चात आजही चळवळ जिवंत करणारी त्यांची लोकगीते लाखोंचा जनसमुदाय मोठ्या रसिकतेने ऐकताना दिसतो आहे.**

चोचीतला चारा, देत होत सारा मायेचा उबारा, देत होत सारा भीमाईपरी चिल्यापिल्यावरी पंख पांघराया, होता माझा भीमराया" वामनदादांची कविता काहीशी ग्रामीण पोत असलेली, पण मानवीमनाच्या कक्षा रुंदावणारी, समाजपरीघ विस्तारणारी बाबासाहेब आणि त्यांचे विचार लोकांना लोकांच्या भाषेत समजावून सांगणारी असल्याने त्यांची गाणी लोकप्रिय झाली.

बाबासाहेबांच्या आयुष्यातले महत्त्वाचे प्रसंग गाण्यातून मांडताना वामनदादांच्या वाणीने प्रेक्षक अक्षरशः भारावून जात असत. वामनदादा एका मुलाखतीत म्हणतात, माझे गीत लोकांचे जीवन गाणे झाले. बाबासाहेबांची शिकवण लोकांच्या ओठावर दिसू लागली. त्रिशरणाची मंगल वाणी सगळीकडे घुमु लागली. वामनदादाची निरीक्षण क्षमता खूप तीक्ष्ण होती. त्यांच्या गीताच्या निर्मितीत याचाच सर्वाधिक फायदा त्यांना झाल्याचे ते सांगतात.बंधू रे शिपाया, तू दे रे दे रुपया हे गीत त्यांनी त्यांच्या आईवर लिहिले होते. त्यांची आई व मामा यांचे संभाषण काळजीपूर्वक ऐकून त्यांनी हे गीत लिहिले होते. वामनदादा यांची एक मुक्तछंदी कविता आहे. ती कवितेपेक्षा त्यांच्या जीवनाचे सार असलेले ते काव्यमय स्वकथन असेच वाटते. त्यातल्या दोन ओळी अशा, बुद्ध, फुले, आंबेडकर यांची कास धरणारा वामन देव, दैव, आत्मा, पुनर्जन्म नाकारणारा वामन आज काल स्वतःला सुशिक्षित व आंबेडकरवादी म्हणून घेणाऱ्या अनेकांना देव, दैव, आत्मा आणि पुनर्जन्म नाकारताना कठीण होत असून अनेक सुशिक्षितांच्या माजघरात देव-देवतांच्या व बुवा-बाबांच्या मुर्त्या व फोटो ठेवलेली आढळून येतात. वामनदादा हे शिक्षणवंचित असूनही हे सर्व थोतांड केवळ नाकारितच नाहीत तर आपल्या गीतातून त्याविरोधात प्रचारही करतात. हे विशेष!

एका गीतात वामनदादा दीनदलितांच्या भूतकाळाचे वर्णन करतात आणि या मरण यातना देणाऱ्या भूतकाळात क्रांतीच्या ज्वाला कशा भडकल्या ते अत्यंत प्रभावीपणे मांडतात. दूर फेकली होती ही जनता कोटी कोटी मिळू दिली ना कोणी कष्टाची चटणी रोटी तरी उपाशी पोटी संदेश भीमाचा ओठी खवळून उठली होती नऊ कोटीची लाचारी इथल्या समाजव्यवस्थेने माणूस म्हणून जगण्याचे सर्व हक्कच हिरावून घेतलेल्या दिनदलितांची लाचारी निशस्त्र असूनही बाबासाहेबांच्या क्रांतीगर्भ विचारांनी कशी पेटून उठते, आपल्या अस्तित्वाची लढाई निकराने लढते आणि जिंकते सुद्धा! हेच वामनदादा यांनी अत्यंत परखडपणे या गीतातून सांगितले आहे.

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर कवी वामन शोक सागरात बुडतो आणि शोकसागरात बुडालेली कवीची प्रतिभा आकांत करतांना म्हणते, वाहायची भिमाई I चिंता चीलापिलांची II ओझी तशीच आता I कोणीच वाहीना गं II अनेक गीतात वामनदादा हे बाबासाहेबांना आई भिमाई म्हटलेले आढळून येते. आईच्या मायेने आपल्या लुळ्या-पांगळ्या समाजास बाबासाहेबांनी ताठ कण्याने उभे केले, हाच संदेश देत असताना ते वर्तमान काळातील चळवळीबाबतीत चिंता व्यक्त करतात. वामनदादा यांनी आयुष्यभर आंबेडकरी विचारांचा सार गीतातून प्रचारित केला. आयुष्यभर ते आंबेडकरी निष्ठा जपत राहिले कारण आंबेडकरी निष्ठा ही त्यांच्या जगण्याची रीत असल्याचे ठामपणे मान्य केले होते. एकूणच आंबेडकरी चळवळीतील माणसांना या निष्ठा जगण्याचे त्यांनी आवाहनच केले होते. वामनदादा दादर येथील समुद्रकाठच्या चैत्यभूमीचे दर्शन घेताना भावनावश होऊन समुद्राच्या लाटांना आपल्या गीतातून विनंती करतात. ते म्हणतात, हळू या गं लाटांनो, कोणाला त्रास होईल ना I इथे निजला गं भीम माझा, तयाला जाग येईल ना II हे गीत ऐकणाऱ्याच्या डोळ्यातून अश्रू आपसुकच ओघळतात. एवढा भावनावश प्रसंग यामध्ये त्यांनी अक्षरबद्ध केलेला आहे. लोककवी वामनदादांनी पन्नास वर्षाहून अधिक गीतरचना व गायन केले आहे. लोकांच्या मनाध्यानात कायम वास्तव्य करून अजरामर झालेला हा कवी अखेरच्या श्वासापर्यंत आंबेडकरी विचारांचा अविष्कार करीत राहिला.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# नायगाव मतदारसंघाचा कायापालट करणारे कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व : आ. राजेश पवार

आधुनिक केसरी

**साईनाथ हमदे**

**उमरी :** नायगाव विधानसभा निवडणुकीच्या प्राचारत एक आमदार दोन कामगार असा नारा आ. राजेश पवार यांनी दिला होता. या प्रमाणे आ. राजेश पवार व सौ. पूनम राजेश पवार यांनी नायगाव मतदारांच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी खेचून आणला आहे. या मतदार संघाचा कायापालट करणारे कर्तृत्ववान व्यक्तीमत्व म्हणून म्हणजे आ. राजेश पवार हे आहेत. नायगाव विधानसभा मतदार संघात जनसामान्यांचा नेता म्हणून आ. राजेश पवार यांची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. ऊन, पाऊस, वारा, थंडी असली तरी संबंधित गावात जाण्यासाठी चांगला रस्ता नसला तरीही त्या गावातील प्रत्येक कुटुंबापर्यंत जाण्याचे काम पवार दामपत्याने केले आहे. त्यांनी प्रत्येक गावातील रस्ते, वीज, पाणी घरकुल आदींचा बारकाईने विचार करून सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आदींना एकत्रित घेऊन सामाजिक धार्मिक, शिक्षण या सर्व गोष्टीची दखल घेऊन काम केले. बचत गटाच्या माध्यमातून सर्वांगिन विकासासाठी अनेक योजना राबविल्या. अनेक भाविकांना देवदर्शनासाठी वाहनांची मोफत व्यवस्था करून औढा नागनाथ, बारड, सत्यगणपती, माहूर आदी ठिकाणी नेऊन देवदर्शन करून आणले. या मतदारसंघातील शेतकरी व तरुणांना कर्ज देण्यास अनेक बँका टाळाटाळ करीत होत्या. ही बाब माहिती होताच आ. राजेश पवार यांनी संबंधित बँकेत जाऊन अधिकाऱ्यांना जाब विचारला व शेतकरी व तरुणांना कर्ज मिळून दिले. शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी येणारी अडचण दूर करण्यासाठी आ. पवार यांनी स्व खर्चातून पांदण रस्ते केले. काही जातीच्या तरुणांना जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी अडवणूक होत होती. आ. पवार यांनी हा प्रश्न विधानसभेत मांडून संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरले. अशा लोकाभिमुख समाज सेवक आ. राजेश पवार यांचा आज वाढदिवस. त्यानिमित्त त्यांनी दवाखान्यात जाऊन फळे, बेडशीट वाटप केले. काही मंदिरावर भंडारे सुद्धा केले. तसेच अनेक ठिकाणी वृक्षलागवड करण्यात आली. समस्त उमरी व ग्रामीण भागातील नागरीकांकडून आ. राजेश पवार यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!









## शहरात मुख्य रस्ता मोकळा करुन अपघात रोखण्यासाठी गतिरोधक बसवाः परतूरकरांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** शहरात मोंढा भागातील रेल्वे गेट पासुन ते दसमले चौक पर्यत मुख्य रस्ता आहे तसेच शहरातील इतर ही रहदारी असलेल्या भागात नविन सपाट रस्ते झालेले असल्याने अनेक लोक भरधाव वेगाने वाहूने चालवत असतात त्यामध्ये अनेक शहरातील निष्पाप बळी जात आहेत त्यामध्ये वयस्कर, तरुण व बालक, महिला यांना अत्यंत मोठ्या प्रमाणात शारीरिक इजा होत आहेत याची दखल म्हणुन शहरातील ज्या ठिकाणी अतिवेगाने वाहने चालत असतात त्या ठिकाणी तातडीने प्लास्टीक, डांबर किंवा सिमेंट चे योग्य असे गतीरोधक प्रशासनाने बसवावे. शहरातील जेष्ठ, युवा माता भगीनी यांना रोज वैयक्तीक कामासाठी बाहेर पडावे लागते परंतू मुख्य रस्त्यावर लागणारे हातगाडे त्यामुळे होत असलेला अरुंद रस्ता हा ही शहरामध्ये अपघाताचे प्रमाण वाढवत आहे.  शहरामध्ये नविन झालेला धर्मविर छत्रपती संभाजी राजे उड्डानपुल व भुयारी मार्ग या ठिकाणी देखील आवश्यक त्या ठिकाणी तातडीने गतीरोधक बसविण्यात यावे तसेच दोन्ही साईडने उड्डानपुलावरुन खाली उतरत असतांना दोन्ही बाजुला स्टील रेलींग बसविण्यात यावेत जेणे करुन वाहने एकमेकांना खेटणार नाहीत व मोठी जीवीत हानी टळू शकेल. यासोबतच शहरातील रेल्वे उड्डाणपूल ते गावं भाग मुख्य रस्त्यावर विविध चौकात ट्रॅफिक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात यावा जेणेकरून भरधाव वेगाने चालविणाऱ्या वाहनचालकांवर नियंत्रण ठेवून कारवाई करता येईल. मुख्य रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी भेगा पडल्या आहेत त्यामुळे वाहने घसरण्याचे प्रमाण वाढले असुन रस्ता व्यवस्थित दुरुस्ती करण्यात यावे. शहरात मुख्य रस्त्यावर दुकानांचे जाहीरात फलक जागोजागी लावल्यामुळे देखील अडथळा निर्माण होत आहे ते सुध्दा दुर करणे गरजेचे आहे असे निवेदन मा.उपविभागीय अधिकारी साहेब, मा. तहसीलदार,नगर परिषद परतूर यांना देण्यात आले.



## मेळघाटात भीषण पाणीटंचाई

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** मेळघाटातील धारणी व चिखलदरा हा या दोन्ही तालुक्यांत पाणीटंचाई तीव्र झाली आहे. आदिवासी वस्त्या तहानेने व्याकुळ झाल्या आहेत. रात्रीबेरात्री पाण्यासाठी आदिवासी बांधवांची भटकंती सुरू आहे. सध्या सात गावांमध्ये टँकरने पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे. मेळघाटातील बेला, मोथा, खडीमल, धरमडोह, आकी, बहाद्दरपूर आणि गौलखेडा बाजार तसेच चांदूर रेल्वे तालुक्यातील सावंगी मग्रापूर या गावांध्ये अकरा टँकरच्या सहाय्याने पिण्याचे पाणी पुरविण्यात येत आहे. या गावामध्ये जलजीवन मिशनची कामे अपूर्णावस्थेत असल्याने तात्पुरती उपाययोजना म्हणून टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

मेळघाट हा डोंगरदऱ्यांचा भाग असून पावसाचे पाणी उतारावरून वाहून जाते. या पाण्याचा फायदा जिल्ह्यातील इतर भागांना होतो. पण मेळघाटातील छोटे पाडे, वस्त्या, ढाणा तहानलेलेच राहतात. दरवर्षी उन्हाळ्यात पाण्याचा प्रश्न डोके वर काढतो आणि पाऊस आला की हा प्रश्न पुन्हा दुसऱ्याच वर्षी चर्चेला येतो. गेल्या दोन दशकांपासून हेच सुरू आहे. परंतु, कायमस्वरूपी उपाययोजना अद्याप करण्यात आलेल्या नाहीत. जलसंधारणाच्या नावावर मेळघाटात मोठ्या प्रमाणात कामे हाती घेतली जातात; परंतु प्रत्यक्षात पाण्याचा साठा होताना दिसत नाही. मेळघाटात पशुधन मोठ्या प्रमाणावर असल्याने त्यांच्याही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट झाला आहे. जेथे माणसालाच पिण्याचे पाणी मिळत नाही, तेथे पशूंची अवस्था आणखी बिकट आहे. गुरांना पाणी पाजण्यासाठी आठ ते दहा किलोमीटर पायपीट करावी लागत असल्याची स्थिती आहे.



# महाराष्ट्र अंनिसकडून प्रेरणा दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** शोध नवोदितांचा ही संकल्पना मनात घेऊन महाराष्ट्र अंनिस पिंपरी चिंचवड शाखा, अंनिस ग्रंथदिंडी यांच्या वतीने प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी अंनिस कार्यकर्ता प्रेरणा पुरस्कार (राज्यस्तरीय) 2023 सन्मान प्रदान सोहळा निगडी येथील ग.दि. माडगुळकर नाट्यगृह येथे संपन्न होत असताना राज्यातून दहा जणांना हा पुरस्कार देण्यात आला. सन्मान पत्र आणि एक हजार रुपये किंमतीची पुस्तके देण्यात आली.हा सन्मान डॉ.मनिषा सोनावणे व अभिजित सोनावणे यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी डॉ.कांकरिया (ट्रस्टी सोनद ट्रस्ट), विश्वास पेंडसे (म अंनिस ग्रंथदिडीं), अनिल चव्हाण (सहसंपादक), तसेच प्राची दुधाने (संस्थापक सहसंचालक वारशा सोशल फाउंडेशन पुणे) आदी उपस्थित होते. रेश्मा कचरे, सविता कोठावळे, मंदाकिनी गायकवाड, सई सावंत, अनिकेत केदारी,विजय पाटील, पांडुरंग तिखे, दिनेश आदलिंग,राहुल केदारी, लालनाथ चव्हाण आदींचा सन्मान करण्यात आला. या सन्मानाबद्दल सर्वांनी विशेष समाधान व्यक्त केले. या पुरस्काराने अजून काम करण्याची जबाबदारी वाढली असल्याचे पुरस्कारार्थी यांनी म्हटलेले आहे.या कार्यक्रमांतर्गत डॉ. अभिजित सोनावणे यांच्या लिखित भिक्षेकरांचा डॉक्टर वैशिष्ट्य पुर्ण आत्मकथन अनुभव चौथ्या आवृत्ती चे प्रकाशन करण्यात आले. तसेच मिलिंद देशमुख (विश्वविक्रमी प्रेरणादायी अनुभव) व दिनेश आदलिंग (स्वयंप्रेरित युवा राष्ट्रीय गरज) चित्रफित दाखवून पुरस्कारांना सुरुवात केली.यावेळी अनेकांनी मनोगते व्यक्त केली. महाराष्ट्र अंनिसचे कार्य याबद्दल विचारमंथन ही करण्यात आले.भिक्षा देण्यापेक्षा मदत करा, हात द्या आणि त्यांना मुळ प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिज. त्यांना भिक्षा देऊन आयतं मिळाल्याने माणूस भिकारी रस्त्यावर निर्माण होतील.

त्यांना कामं करायला प्रोत्साहन दिले तरं स्वावलंबी होतील, असे डॉ अभिजित सोनावणे यांनी सांगितले.

# अवैध उत्खनन करणाऱ्या पोकलेनसह पाच हायवा ट्रक जप्त; सानप यांची कार्यवाही

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** औंढा रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सूरु आहे या कामासाठी तालुक्यातील चामणी येथील एका शेतातून अवैध रित्या मुरुमाचे उत्खनन करून ते रस्त्याच्या कामासाठी वापरले जात असल्याची माहिती सेलूच्या उपविभागीय अधीकारी संगीता सानप यांना मिळाली त्यांनी त्यांच्या पथकासह पाहणी केली असता त्या ठिकाणी अवैधरित्या उत्खन सुरू असल्याचे दिसून आल्याने त्यांनी अवैध उत्खनन करणारे पोकलेन व पाच हायवा ट्रक जप्त करून तहसील कार्यालयाच्या आवारात आणून लावले ही कार्यवाही सोमवार दि 13 मे रोजी चार वाजेच्या सुमारास घडली. या बाबत अधिक माहिती अशी की जिंतूर ते औंढा सिमेंट रस्त्याचे काम सुरू असून या कामासाठी चामणी येथील गट क्रमांक 62 मध्ये अवैध रित्या मुरुमाचे उत्खनन करून तो मुरूम हायवा द्वारे रस्त्याच्या कामासाठी वापरला जात होता दरम्यान अवैद्य मुरूम वाहतुकीची माहिती सेलूच्या उपविभागीय अधिकारी संगीता सानप यांना मिळाली त्यावरून त्यांनी चामणीचे तलाठी स्नेहा गायकवाड,मोहसीन पठाण,पाटील यांना सोबत घेऊन पाहणी केली यावेळी संबंधित कंत्राटदाराने कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता नमूद गट नंबर मध्ये पोकलेन मशीन द्वारे उत्खनन करून ते हायवा ट्रकद्वारे वाहतूक करून रस्त्याच्या कामाला वापरत असल्याचे दिसून आले त्यांनी लगेच उत्खनन करणारी पोकलेन मशीन सह मुरुमाने भरलेले हायवा क्रमांक एम एच 12 व्ही टी 5926,एम एच 12 व्ही टी 5920, एम एच 12 व्ही टी 5928,एम एच 12 व्ही टी 5924,एम एच 12 व्ही टी 5927,एम एच 12 व्ही टी 5927 हायवा जप्त केले असून सर्व वाहाने तहसील कार्यालयात आणून लावण्यात आले या कार्यवाहिमुळे अवैध उत्खनन करणाऱ्याचे धाबे दणाणले असून शहरातील विविध भागात दररोज मोठ्या प्रमाणात अवैध रित्या गौण खनिजांची चोरटी वाहतूक होत असल्याने त्याकडेलही लक्ष देण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.




# पैसे देण्या-घेण्याच्या कारणावरून चाकू भोसकून जिंतुरात तरुणाचा खून

## घटनेतील दोन आरोपींना पोलीसांनी केली अटक

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शहरातील साठेनगर भागातील नॅशनल उर्दू स्कुल



परिसरात तीन तरुणांमध्ये पैसे देण्याघेण्याच्या कारणावरून उद्भवलेल्या फ्रिस्टाईल हाणामारीत एका ३६ वर्षीय तरुणाच्या पाठीवर चाकू भोसकून खून केल्याची धक्कादायक घटना मंगळवार १४ मे रोजी सायंकाळी ०७:३० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणी मायताचे वडील तय्यब कुरेशी यांच्या फिर्यादीवरून दोन आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी रात्री उशिरा दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

सदरील घटनेविषयी अधिक वृत्त असे की, शहरातील साठे नगर येथील ३६ वर्षीय सगननुर उर्फ छगन कुरेशी त्याचा ३१ वर्षीय चुलत भाऊ अलीम कुरेशी आणि चुलत भावाचा ३२ वर्षीय मित्र अमजद कुरेशी हे तिघेजण साठे नगर भागातील नॅशनल उर्दू शाळेच्या परिसरात गेले होते. तिघांध्ये पैसे देण्याघेण्याच्या कारणावरून शाब्दिक चकमक झाली. बघता बघता शाब्दिक चकमकीने उग्ररूप धारण केल्याने परिसरात तिघांमध्ये हाणामारी सुरू झाली. यातील आरोपी अमजद कुरेशी यांनी सगननुर उर्फ छगन कुरेशी याचे हात धरले आणि अलीम कुरेशी याने धारदार चाकूने त्याच्या पाठीवर जोरदार प्रहार केल्याने सगननुर उर्फ छगन कुरेशी गंभीर जखमी होऊन काहीवेळ घटना स्थळावर रक्तबंबाळ अवस्थेत पडून असल्यामुळे त्याचा प्रचंड रक्तस्राव झाला. यानंतर जखमी तरुणाला शहरातील ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. काही क्षणातच रुग्णालय परिसरात मोठा जमाव जमा झाला. परिस्थिती आवाक्या बाहेर जाऊ नये म्हणून पोलिसांनी उपविभागातील पोलीस अधिकारी आणि वाढीव पोलीस कुमकला पाचारण करण्यात आले होते. मात्र जखमी युवकाची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यावर प्राथमिक उपचार करून परभणी हलविण्यात आले. परंतु रस्त्यातच तरुणाने प्राण सोडले. याप्रकरणी मयताचे वडील तय्यब कुरेशी यांच्या फिर्यादीवरून दोन आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी रात्री उशिरा दोन्ही आरोपींना अटक केली आहे. दरम्यान घटनेची माहिती मिळताच गोपनीय शाखेचे पोलीस हवालदार जिया खान यांच्या सह अप्पर पोलीस अधीक्षक यशवंत काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल ओव्हाळ, स्थागुशा पो नि अशोक घोरबांड, पोनि बुद्धिराज सुकाळे आदींनी भेट दिली. परंतु मागील अकरा दिवसात शहरात सार्वजनिक ठिकाणी खुनाच्या दोन घटना आणि दोन गटात झालेल्या सशस्त्र हाणामारीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# नकली कोण आणि असली कोण हे चार तारखेनंतर कळेलच : रोहित पवार

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** पिंपळगाव येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे आणि डॉ. भारती पवार यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. या सभेतून त्यांनी शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर टीका केली. नकली शिवसेना आणि नकली राष्ट्रवादीचे काँग्रेसमध्ये नक्की विलिनीकरण होणार, असे त्यांनी म्हटले. आता यावरून आमदार रोहित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे.

रोहित पवार म्हणाले की, नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघात १३ लाख मतदार कांदा उत्पादक शेतकरी आहेत. त्या व्यतिरिक्त द्राक्ष उत्पादक आणि अन्य उत्पादक वेगळे आहेत. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोदींच्या सभेत बंदी केली असेल तर मोदींचा आणि भाजपचा विश्वास मतदारांवर देखील राहिलेला नाही.

त्यांना फक्त शो बाजी करायची होती. आम्ही सभा घेऊ शकतो हे दाखवायचं होतं. मोदींच्या पिंपळगावच्या सभेत धुळे, नगरहून लोकं आणली गेली, असा आरोप रोहित पवार यांनी केला. तर मतदार कमी आणि कार्यकर्ते काही प्रमाणात अशी परिस्थिती मोदींच्या सभेला होती. मोदींच्या आजच्या सभेत कुठेही उत्साह नव्हता, मोदींनी देखील भाषण आवरते घेत तिथून काढता पाय घेतला, असा टोला त्यांनी यावेळी लगावला.

पंतप्रधान मोदींनी शरद पवार यांच्यावर केलेल्या टीकेवर रोहित पवार म्हणाले की, मोदींच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात शेतकऱ्यांचं इथे भलं झाल्याचं आपण पाहिले आहे का? शेतमालाला भाव नाही, बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. महिला सुरक्षेचा प्रश्न देशात मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. 2014 मध्ये मोदींनी सांगितलेली एकही गोष्ट त्यांनी दहा वर्षात पूर्ण केली नाही. शरद पवार आणि उद्धव ठाकरेंवर बोलण्यापेक्षा मोदींनी शेतकऱ्यांसाठी काय केलं हे बोलायला हवं होतं. नकली कोण आणि असली कोण हे चार तारखेनंतर आपल्याला कळेल. असली लोक हे मतदार आहेत आणि ते असली लोकांच्याच पाठीमागे आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीलाच यश मिळेल, असे त्यांनी म्हटले. इंडिया आघाडीचा निवडणुकीत दयनीय पराभव होईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटले. यावर रोहित पवार म्हणाले की, या निवडणुकीत भाजप आणि मित्र पक्षांची अतिशय वाईट परिस्थिती होईल, याची मोदींना भीती वाटते आहे. सर्व्हेमध्ये भाजपची पीछेहाट होतानाच दिसतेय. सामान्य कुटुंबांना भाजपने अडचणीत आणलं आहे. मोदींनी सुरुवात विकासावर केली. नंतर हिंदू मुस्लिमवर आले. नंतर भटकती आत्मावर आले नंतर अदानी अंबानींवर आले. आता शरद पवार आणि उद्धव ठाकरेंना ते आमच्याकडे या असं सांगतायत, मोदी भरकटत चाललेत. सामान्य लोकांच्या हिताचे मुद्दे त्यांच्या भाषणातून बाजूला पडतायत, अशी जोरदार टीका रोहित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केली.

# खडकवाडी येथील रावसाहेब व रूक्मिणीबाई सानप दांपत्याचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** खडकवाडी(ता.पाटोदा) येथील जेष्ठ नागरिक रावसाहेब नारायण सानप (वय ८८वर्षे, ह.मु.गजानन कॉलनी बीड) यांचे 14 मे रोजी वृद्ध काळाने निधन झाले.तर त्यांच्या पत्नी रुक्मिणीबाई रावसाहेब सानप (८२वर्ष)यांचे 10 मे रोजी निधन झाले होते. आवघ्या चारच दिवसात आई वडीलांचे निधन झाल्याने सानप कुटुंबीयांवर दुःखाचे डोंगर कोसळला. बीड शहरातील गजाणन कॉलनीतील रहिवासी आणि मूळ खडकवाडी तालुका पाटोदा येथील जेष्ठ नागरिक नारायण सानप आणि रुक्मिणीबाई रावसाहेब सानप या पती-पत्नीचे चार दिवसाचा फरकाने वृद्ध काळाने निधन झाले. आईच्या निधनानंतर सानप कुटुंबीयांनी तिसऱ्या दिवशी वडीलांना सोबत घेऊन जाऊन 13 मे रोजी खडकवाडी येथील मतदान केंद्रावर मतदानाचे कर्तव्य पार पाडले होते. रावसाहेब आणि रूक्मीनबाई सानप यांच्यावर बीड शहरातील स्मशानभूमीत



अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात, सेवानिवृत्त मंडळाधिकारी विठ्ठल सानप, पांडुरंग सानप, आणि पुणे येथील व्यवसायिक डॉ.भास्कर सानप हे तीन मुले, सुभद्रा पुंडलिक पाखरे मुलगी, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# महाविकास आघाडी व अपक्ष उमेदवार सध्या, सल्ले आणि आश्वासनांच्या तव्यावर भाजताहेत आपली पोळी

आधुनिक केसरी न्यूज

**महेश तारमळे**

**ठाणे :** भिवंडी लोकसभेची निवडणूक चार दिवसावर येऊन ठेपली आहे, बाळ्यामामाने ऐन वेळेला महाविकास आघाडीतुन उमेदवारी पदरात पाडून घेतली खरी परंतु जागा कॉग्रेसची उमेदवारी घेतली राष्टवादितुन अद्यापही कॉग्रेस मधील कुरबुर थांबत नाही तर राष्टवादितुन उमेदवारी घेतल्याने त्यांच्यात उमेदवारा विषयी,,, मोले घातले रडाया अशी आहे, आजच्या घडीला बाळ्या मामाच्या रॅलीत "आमआदमी" ऐवजी गाड्याच्या ताफ्याचा धुरळा उडवताना दिसून येतो,तसही नाक्यानाक्यार दर्शन दिल गेल, त्यांतच त्यांची प्रचार यंत्रणा ही स्थानिक कार्यकर्त्यांच्या हातात नसून नात्या गोत्यातील सोयरे धायरेच्या हातात असल्याने आपला मतदान कोणता व परका कोणता हे तपासण्यासाठी अवघड जात असल्याने मतदारा पर्यत चिन्हच पोहचणार नसले तर पुढचं काही विचारायलाच नको,,,, अपक्ष उमेदवार निलेश सांबरेची अवस्थातर फारच दयणीय आहे, उमेदवार अपक्ष असल्यान सर्वच राजकिय पक्षातील कार्यकर्ते पदधिकारी हे त्यांच्या सोबत जाण्याचे टाळतात कारण कधी फोटो व्हायरल होईल व पक्षातील विस्वासार्थता धोक्यात येईल याची दक्षता घेतली जातेय, तसही निलेश सांबरे यांनी अर्ज भरताना दोन अर्ज भरून संभ्रम निर्माण करून ठेवला आहे, प्रचारात विकासाचा मुद्दा नसून भाजपा च्या कपिल पाटला बाबत चकार शब्द हि काढीत नाहीत तर शासनाकडून मिळालेल्या निधीतून शाळा कॉलेज दवाख़ाने उभारले असून त्याचे श्रेय मात्र राजकारणा साठी घेत आहेत ठेकेदारीतु केलेल्या अनेक



रस्त्यांची निकृष्ट कामे,अपुर्ण कामावर नागरिकांचे बळी जात असल्याने संताप व्याक्त केला जात आहे जातीच्या नावे मताचा जोगवा मागण्याचा खटाटोप केला गेला तर या मतदार संघातील जातीच्या गावात यांच योगदान शुन्य उलट कोलठण सारख्या गावात ब्लांस्टींग करून अनेकांची घर उद्धवस्त करून ठेवली आहेत व कुणबा समीजातील तरूणा वर खोट्या केसेस करून त्यांना नाहक त्रास दिला गेला आहे, सन २०१४-१९ या निवडणूकीत कुणबी गावात कपिल पाटलांच्य मतात घट झाली होती परंतु या वेळेस अपक्ष उमेदवारांच्या जातीवादातुन कपिल पाटलाचा फायदा होणार कारण जातीवादात ईतरजाती दुरावल्या स त्यांच मतदान कपिल पाटलांना हमखास होणार यात शंक़ाच नाही, केवळ महिलांना केली जाणारी भाऊबिज या व्यातिरिक्त योगदान नसलेले जातीच्या नावे मत मागत नाहीत तर एकोप्यान रहात असलेल्या कुणबी समाजात हे जातीच विषाच बिज पसरवून भविष्यात कुणबी समाजाल एकटं पाडण्याचो जणू षडयंत्र रचीत असल्याने या समाजातील उच्चशिक्षीत पिढी जाणून असल्याने हि गफलत या वेळेस तरी होणार नाहीच, विद्यामान खासदार कपिल पाटिल हे गेल्या तीन वर्षा पासून पंचायतराजमंत्री असल्याने गावोगावी शासनाच्या निधीतुन स्वताच्या करोडोच्या निध़ीतुन विकास साधला गेला असून कपिल पाटिलां सोबत शेकडो कार्यकर्ते गावोगावातील तसेच सर्वच पक्षातील नेत्या सोबतचे घरोब्याचे संबध पाहता त्यांची निश़ाणी देखील सर्व परिचित असून ईतरांची अवस्था पाहता ज्याला मत द्यायचं तोच जर पाहिलाच नाही तर मत द्यायचं तरी कसं असा सवाल मतदान करतील यात नवल नाही,एकंदरीत पाहता या वेळेस कपिल पाटलांच्या विजयाची हॅटट्रीक ही अपक्षाच्या प्रयत्नातुन साधली जाणार असल्याचे जाणकारांचे "मत"आहे.

# मुस्लिमांशी नाते घट्ट असल्याचे म्हणणाऱ्या नरेंद्र मोदींचे पुन्हा मुस्लीम द्वेषावरच भाषण : नाना पटोले

## देशातील १४० कोटी जनताच ४ जूनला भाजपाचे दुकान बंद करणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मोदी सरकारने कधीच कोणाला धर्म विचारला नाही व धर्माच्या नावावर योजनाही राबवल्या नाहीत. मुस्लीमांशी आपले नाते घट्ट आहे व मतांसाठी आपण काम करत नाही असे सांगणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पुन्हा जाहीर सभेत राम मंदिर व मुस्लीम द्वेषावर भर देऊन लोकांची दिशाभूल करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला, आता देशातील जनता नरेंद्र मोदींच्या थोपेबाजीला बळी पडणार नाही, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी काँग्रेस पक्षाच्या जाहिरनाम्यावर सातत्याने बिनबुडाचे आरोप करत आहेत. मुस्लीमांना संपत्ती वाटणार हे काँग्रेसच्या जाहीरनाम्यात कुठेच नाही हे स्पष्ट असतानाही नरेंद्र मोदी पुन्हा पुन्हा काँग्रेस मुस्लीमांना संपत्ती वाटणार असा अपप्रचार करत आहेत.
आरक्षणाच्या मुद्यावरही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर केलेले आरोप धादांत खोटे आहेत. आरक्षणाला आरएसएस व भाजपाचाच विरोध आहे उघड असताना काँग्रेस एस.एस., एस.टी. व ओबीसींचे आरक्षण काढून मुस्लीमांना देणार या आरोपात




काहीही तथ्य नाही. पंतप्रधान पदावरील व्यक्तींनी काहीतरी ताळतंत्र ठेवून बोलावे अशी अपेक्षा असते पण आरएसएसच्या खोटे पसरवण्याच्या शिकवणीतून नरेंद्र मोदी यापेक्षा वेगळे काही बोलू शकतील असे वाटत नाही. काँग्रेसवर मुस्लीम तुष्टीकरणाचे आरोप करणाऱ्या नरेंद्र मोदी यांच्या भाजपाने आंध्र प्रदेशात चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगु देसमशी युती केली आहे. याच तेलुगु देसमने हज यात्रेसाठी १ लाख रुपयांची मदत करण्याचे आश्वासन दिले आहे हे मोदींना कसे चालते? असा सवाल पटोले यांनी केला आहे.
घाटकोपर भागात कालच होर्डिंग दुर्घटनेत १४ नागरिकांचा बळी गेला आहे, मुंबईकरांसाठी हा एक मोठा धक्का आहे परंतु भाजपा व नरेंद्र मोदी यांना या घटनेचे काहीही गांभिर्य नाही, ज्या घाटकोपर भागात ही घटना घडली त्याच भागातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा रोड शो होतो हे संताप आणणारे आहे यातून पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपाची असंवेदनशीलता दिसून येते, असेही नाना पटोले म्हणाले.
काँग्रेस विरोधी पक्षही बनू शकणार नाही, उद्धव ठाकरेंची शिवसेना व शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नकली आहे असे असेल तर या पक्षांची एवढी चिंता करण्याची नरेंद्र मोदी यांना काय गरज आहे? वास्तविक पाहता भारतीय जनता पक्षाचा लोकसभा निवडणुकीत दारूण पराभव होत आहे या चिंतेने नरेंद्र मोदी यांची झोप उडाली आहे, या भितीपोटी ते काहीही बोलत आहेत. काँग्रेसचे दुकान बंद होण्याची चिंता करण्यापेक्षा नरेंद्र मोदी यांनी त्यांची व भाजपाच्या पराभवाची चिंता करावी, असेही नाना पटोले म्हणाले.

# बॉम्बस्फोटाची धमकी देणाऱ्या कसाबविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** आरडीएक्सने रेल्वे स्टेशन उडवून देण्याची फोनवरून धमकी देणारा पाकिस्तानातील कसाब असल्याने पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून लाहोरच्या कसाबचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. पोलिसांनी सांगली, मिरज रेल्वे स्टेशनची झाडाझडती घेतली असून आक्षेपार्ह काहीही आढळले नसले तरी या धमकीची गांभीर्याने दखल घेण्यात आली असून कसाबविरुद्ध सांगली शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमवारी रात्री सांगली शहर पोलीस ठाण्यात ०८५५१८४५६६० या भ्रमणध्वनी क्रमांकावरून फोन आला होता. फोनकर्त्यांने आपण लाहोरमधून रियाज कसाब बोलत असून आपण दहशतवादी असल्याचे सांगितले, तसेच आपणासोबत पाच व्यक्ती असून आरडीएक्स आहे. सर्वजण रेल्वे स्टेशन परिसरात बॉम्ब ठेवणार असल्याचे त्या व्यक्तीने फोनवरून सांगितले. या फोनची तत्काळ गांभीर्याने दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी मिरज व अप्पर अधीक्षक रितू खोकर यांनी सांगली रेल्वे स्टेशनची पोलीस पथक, बॉम्ब शोध पथक यांच्यामार्फत झाडाझडती घेतली. सोमवारी रात्रभर ही मोहीम सुरू होती. या वेळी रस्त्यावर असलेल्या सर्व वाहनांचीही झडती घेण्यात आली. रात्रभरच्या शोध मोहिमेनंतर ही पोकळ धमकी असल्याचे स्पष्ट झाले.



# गोल्डन ज्युबली मित्रमंडळ सारडेचा ३६ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणाऱ्या व गोर गरिबांना नेहमी मदतीचा हात देणाऱ्या गोल्डन ज्यूबली मित्र मंडळ सारडे या सामाजिक संस्थेचा ३६ वा वर्धापन दिन राधाकृष्ण मंदिर, सारडे, उरण येथे मान्यवरांच्या उपस्थितीत व विविध उपक्रमांनी मोठया उत्साहात संपन्न झाला.दुपारी २ ते ४ श्री सत्यनारायणाची महापूजा, सायंकाळी ५ ते रात्री १० महाप्रसाद, पाहुण्यांचे स्वागत व सत्कार, आदी विविध धार्मिक, सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पनवेल महानगर पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, श्री साई देवस्थान साई मंदिर वहाळचे संस्थापक अध्यक्ष रवीशेठ पाटील, केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था वेश्विचे संस्थापक राजू मुंबईकर, आगरी कोळी कराडी संघर्ष सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष भारत भोपी, सारडे ग्रामपंचायतचे सरपंच रोशन पाटील, उपसरपंच जीवन पाटील, गोवठने विकास मंचचे अध्यक्ष सुनिल वर्तक, माजी सरपंच नरेंद्रशेठ मुंबईकर, सामाजिक कार्यकर्ते मनोज पाटील, पोलीस पाटील घनश्याम पाटील, ग्रामपंचायत सारडेचे सर्व सदस्य, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील,उपाध्यक्ष विठ्ठल ममताबादे, आदी मान्यवरांनी कार्यक्रम स्थळी भेट देऊन गोल्डन ज्यूबली मित्र मंडळ सारडेच्या विविध सामाजिक कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.सदर सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गोल्डन ज्यूबली मित्र मंडळ सारडे तसेच सारडे ग्रामस्थांनी विशेष मेहनत घेतली.

# नीलेश सांबरे यांचं नक्की चाललंय काय

आधुनिक केसरी न्यूज

**महेश तारमळे**

**ठाणे :** भिवंडी लोकसभेतील अपक्ष उमेदवाराच्या येथील उमेदवारीवरच प्रश्न चिंन्ह निर्माण होऊ लागल आहे प्रथम त्यांनी दोन उमेदवारी अर्ज भरले त्यात अपक्ष व कॉग्रेसने अगोदर उमेदवारा दिला असता त्या कडून अर्ज भरणे आपल्या प्रचारात शेवटच्या टप्प्यातही कपिल पाटला बाबत एकही चकार शब्द न काढणे, अनेक ठिकाणी अनेक वेगवेगळी वक्तव्य करत आपला प्रचार हा कसा अभ्यासपूर्ण नाही किंवा त्याला एक दिशा नाही हे स्वतः सिद्ध करीत आहेत,शहापूर मतदार संघाच्या बाबतीत ज्या मतदार संघाची दोन सव्वा दोन लाख मतदान आहे तेथे ते म्हणतात आपल्याला दीड लाखाचा मताधिक्य पाहिजे साठ टक्के मतदान झाले तरी ते एक सव्वा लाखापर्यंत पोहोचतील मग यांना दीड लाख लीड मिळेल कसा ? आता भिवंडीकरांची विशेषत मुस्लिम मतदारांची मतं मिळवण्यासाठी त्यांनी मी काँग्रेसमध्ये प्रवेश घेणार अशी विधान करायला सुरुवात केली आहे मग यापूर्वी काँग्रेसमध्ये प्रवेश का घेतला नाही ? इथे दस्तुर खुद्द राहुल गांध़ी येऊन गेले मुळात या भिवंडी मतदार संघात त्यांचे कसलेच योगदान नसताना व स्वतःचे ते कार्यक्षेत्र असलेले पालघर सोडून अपक्ष उमेदवार निलेश सांबरे हे भिवंडीत येऊन लढत आहेत आणि यांची आतापर्यंतची वाटचाल पाहता त्यांच्या या मत विभाजनाचा फायदा केवळ भाजपला होणार आहे भाजपाचे गोटातील् तसेंच अनेक दिग्गज जे निवडणुकांबाबत विश्लेषण करतात ज्यांची भाकीत खरी ठरतात त्यांचे देखील हेच म्हणणे आहे की या उमेदवाराला उभे केला आहे ते केवळ भाजपचे उमेदवार निवडून यावे या साठी आहे. शाळा, दवाखाने, यासाठी अनेक ठिकाणाहून या संस्थेला फंडिंग होत असेल सी एस आर असेल इंटरनॅशनल लेवलचा फंड देणाऱ्या कंपन्या फंड देतात परंतु हे मात्र समाजसेवेच्या मोबदल्यात आज मतं मागत आहेत,परंतु शासनाचा गरीब माणसाचा जो काही कराचा पैसा आहे ज्याच्या माध्यमातून रस्ते यासारख्या मूलभूत गोष्टी शासन राबवीत असते त्या जनतेच्या कष्टाच्या पैशाची मात्र हे धूळधाण करीत आले आहेत,मग त्यात शहापूर पालघर संपूर्ण ठाणे जिल्ह्यात अत्यंत निकृष्ट दर्जाचे कामे यांचीच कंट्रक्शन कंपनी करीत आली आहे,अनेक रस्ते हे अपूर्ण आणि करोडो रुपयांची रस्त्याची कंत्राट घेतलेले अनेक रस्ते यांनी अपूर्ण ठेवलेत अतिशय निकृष्ट दर्जाचे बांधकाम करून ते अर्धवट केले आहेत,या रस्त्यावर अनेक निरापराध बळी गेले आहेत त्यांचे शाप यांना लागणारच परंतु हा हिशोब द्यायला जिजाऊ आणि त्यांचे पगारी तयार नाहीत,निलेश सांबरे हे प्रसिद्धी सारख्या माध्यमावर आपले शिक्षण हे सांगताना गफलत करीत वेगळे वेगळे सांगताना दिसून येतात व निवडणूक फॉर्म मध्ये वेगळ (नमूद) लिहितात संपत्ती च्या बाबतीत खरी महिती लपवली म्हणून एक फॉर्म रद्द झाल्याचे बोलले जातेय,एकंदरीची त्याची वाटचाल ही अशीच आहे. आता पालघर -ठाणे -शहापूर-मुरबाड या भागात यांनी प्रचाराला जातीवादी रंग द्यायला घेतलाय जातीसाठी माती खा अशा प्रकारचा छुपा अजेंडा येथून राबवला जातोय पण जातीचा राजकारणात कुणीही मोठे झाले नाही ,हा या लोकसभा मतदारसंघाचाा इतिहास आहे, निलेश सांबरे यांचे ध्येय हे केवळ भाजपच्या उमेदवाराला निवडून देणे हेच या वर्तणकी वरून दिसून येत त्या कडे प्रचाराची कोणती ही दिशा नसणे,मतदार संघाचा अभ्यास नसणे,केवळ मत विभाजनाचे काम हे निलेश सांबरे करित आहेत,आणि भाजपच्या उमेदवार कसा निवडून येईल यासाठी त्यांची सर्वतोपरी प्रयत्न चालू आहे .हे न समजण्या ऐवढे दुधखुळे मतदार नाहीतच हे येणार काळच दाख़वून देईल?



# सोयगाव तालुक्यात ट्रॅक्टरच्या साहाय्याने होतायेत कामे

## उष्णतेच्या लाटेतही शेती मशागतीसाठी मोठी लगबग

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** सावळदबारा परिसरात सध्या उन्हाचा तीव्र तडाखा जाणवत असून शेतातील जवळपास सर्वच पिकांची काढणी झाली आहे. पावसाअगोदर जमिनीची मशागत केल्यास उत्पादन क्षमतेत वाढ होते. त्यामुळे शेतकऱ्यांची तीव्र उन्हातही नांगरणीसाठी लगबग सुरू असल्याचे दिसून येत आहे. नागरणीसह इतर कामांसाठी शेतकरी आता बैलजोडीऐवजी ट्रॅक्टरने मशागत करण्याला प्राधान्य देतात. त्यामुळे ट्रॅक्टरने नागरणीसह इतर मशागत करण्याचे भाव गगनाला भिडले आहेत. पावसाळ्यापूर्वी जमिनीची नांगरणी केल्यास शेती चांगली तापते. त्यामुळे खरीप हंगामात पिके जोमाने येतात. शेतात तणाचे प्रमाण कमी होते, असा शेतकऱ्यांचा अनुभव आहे.दरम्यान ट्रॅक्टरच्या साहाय्याने नांगरणी केल्यास मातीची चांगली पलटी होऊन पिके



जोमाने येतात. त्यामुळे शेतकरी बैल नागरणीऐवजी ट्रॅक्टरचा वापर करीत आहे. ट्रॅक्टरला मागणी वाढल्याने नांगरणीसाठी जवळपास एकरी दोन हजार रुपये खर्च येत आहे. पाऊस पडल्यानंतर जमिनीची पुन्हा मशागत करावी लागते. सोयाबीन, तूर,हरभरा, ज्वारी कांदा, तीळ, हळकुंड, गहू आदी पिके निघून गेल्यानंतर जमिनीची नांगरणी करण्याची पद्धत आहे. ओलिताच्या काही शेतांमध्ये अजूनही पिके असल्याने हिरवळ दिसून येते. परिसरातील बहुतांश शेतातील पिके निघून गेल्याने उन्हाच्या तडाख्यात्त नांगरणीची लगबग सुरू असल्याचे चित्र सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात दिसत आहे.जिरायती शेतीमधून कमी उत्पादन मिळत असले तरी नांगरणीचा खर्च मोठ्याप्रमाणात शेतकऱ्यांना करावा लागतो. सध्या शेतकरी मशागतीच्या कामात व्यस्त आहेत.बैलांच्या दावण्या होतायेत रिकाम्या पारंपरिक पद्धतीची नांगरणी आता इतिहासजमा झाल्याचे दिसून येते. पूर्वी बघायला मिळणाऱ्या प्रत्येक कास्तकारांकडील बैलजोड्या आता दिसत नाहीत. एका शेतकऱ्याच्या दावणीला दोन ते तीन बैल जोड्या दिसायच्या. बदलती शेती व महागाईमुळे बैल जोड्या टिकविणे जिकिरीचे झाले आहे. ट्रॅक्टरचा वापर वाढल्याने बैलांच्या दावण्यांची जागा खाली झाली. त्यामुळे पारंपरिक शेती संस्कृतीला घरघर लागली असल्याचे दिसून येते.

**सालगडी घेतो एका वर्षात एक ते दीड लाख लागतात :** सालगड्याचे भाव लाख ते दीड लाख रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. तरी शुद्धा ऐवढे पैसे देऊन सालगडी ग्रामीण भागात मिळत नाही .यामुळे शेती करण्याच्या खर्चातसुद्धा मोठ्याप्रमाणात वाढ झाली आहे . त्यागा बदलत्या वातावरणामुळे उत्पादनातही घट येत आहे . तसेच अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेती व्यवसाय तोट्यात आहे .यावर्षी शेतीचा मक्तासुद्धा मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते . १० एकरावर बार्षिक दीड ते दोन लाख रुपये मिळतात असे शेतकरी परिसरातील शेतकरी सांगतात .
**दारासिंग बंडू चव्हाण, माजी सरपंच तथा शेतकरी नांदा तांडा, ता . सोयगाव**



# भीषण पाणी टंचाईमुळे कोपरगाव शहरातील महिला व नागरिक त्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** नगरपरिषदेच्या माध्यमातून जवळपास एक महिन्यापासून कोपरगाव शहर व परिसरातील उपनगरातील नागरिकांना बारा दिवसात पाणी पुरवठा केला जात असल्यामुळे नागरिकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असून यामुळे महिला वर्गात मोठ्या प्रमाणावर नाराजी पसरली असून धरणाच्या पाणीसाठ्यात कमी असलेला पाणीसाठा हे कारण सांगितले जात आहे तरी कोपरगाव नगर परिषदेने जलद गतीने स्वच्छ व शुद्ध पाणीपुरवठा देण्यासाठी धोरणात्मक पाऊल उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

कोपरगाव शहराजवळ गोदावरी नदी वाहत असतानाही पाणीटंचाईच्या समस्येला कोपरगावकरांना कायमस्वरूपी होणारा त्रास कधी बंद होणार असा सवाल विचारला जात आहे पाणी साठवणूक करण्यासाठी महिलांना देखील उपयोगात आणत असल्याची चित्र दिसून येत आहे ज्यांच्याकडे पाणी साठवणूक करण्याची क्षमता नाही त्यांना मात्र बारा दिवस पाणी कसे पुरवावे हा प्रश्न उभा राहत असल्यामुळे कोपरगाव नगरपरिषदेने तात्काळ पाणी पुरवठा करण्यासाठी तात्काळ धोरणात्मक  निर्णय घेऊन लोकांची अडचण दूर करावी अशी मागणी आता पुढे आली आहे.

# बागेश्वरी साखर कारखाना येथे भव्य आरोग्य शिबिर संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** तालुक्यातील वरफळ येथील श्रध्दा एनर्जी प्रा. लि.संचलित मां बागेश्वरि साखर कारखाना येथे ग्रामीण रुग्णालय परतूर, आय.एस.आर.एस.डी. जालना,लिंक वर्कर स्कीम जालना, मातोश्री अन्नपूर्णा फाउंडेशन परतूर, सेतु चॅरीटेबल ट्रस्ट जालना यांच्या संयुक्तं विद्यमाने भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराकरिता जनरल मॅनेजर आर.आर. निर्वळ, वैद्यकीय अधिक्षक डॉ.एल.पी. दुर्गावाड, डॉ. ज्ञानदेव नवल, जिल्हा पर्यवेक्षक राजेश गायकवाड, प्रकल्प संचालिका मंदाकिनी पडूळ, जिल्हा साधन व्यक्ती किशोर मुळे, सेतुचे शकील शेख या सर्वांचे मार्गदर्शन लाभले.



आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी आर.बी. एस.के.चे डॉ. महादेव उनवने, डॉ.पायल माने, आय.सी.टी.सी.चे समुपदेशक शिवहरी डोळे, एन.सी.डी.च्या मनिषा निकाळजे, क्षयरोग उपचार पर्यवेक्षक अशोक खरात,सलीम शेख,परिचारिका अनुसया पवार, विजय बकान, एच.एल.एल.चे दिपक साळवे, अनिरुद्ध कदम,प्रियंका कांबळे, नरेश सोनवणे तसेच बागेश्वरि साखर कारखान्याचे बी.ए.पाटिल, एच.ए.मुंगळे,डी.आर.लिपणे, राहुल माने,गजानन जाधव, एम.एस.मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले. या शिबिराचे नियोजन एल.डब्लू.एस.चे नरेश कांबळे यांनी केले होते. यावेळी कामगारांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला यावेळी १३२ कामगारांच्या सी.बी.सी., शुगर,बी.पी.,क्षयरोग, एच.आय.व्ही.तसेच रक्तातील इतर तपासण्या करण्यात आल्या.

# डाभा येथील मतदान केंद्रावर ८१ टक्के मतदान; शांततेत मतदान प्रक्रिया

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील डाभा येथे सोमवारी लोकसभेचे मतदान शांततेत पार पडले. या मतदान केंद्रावर ८१%५२ टक्के मतदान झाले.
जिल्हा परिषद शाळा येथील तर जिल्हा परिषदेच्या शाळेत दोन बूथ होते. सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात झाली. सकाळी अकरा वाजेपर्यंत मतदारांनी मतदान करण्यासाठी बऱ्या पैकी रांगा लावल्या होत्या मात्र अकरावाजे नंतर उन्हाचा पारा वाढल्याने मतदाराचा ओघ कमी झाला. दुपारी पुन्हा तीन वाजल्या पासून मतदार मतदान करण्यासाठी बाहेर पडू लागल्याचे दिसू लागले. दुपारी चार वाजेपर्यंत या मतदान केंद्रावर ५० टक्के मतदान झाले होते. चार वाजेनंतर मतदारांनी पुन्हा मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी मोठ्या रांगा लावल्याचे दिसले. मतदान केंद्रांच्या बाहेर विविध पक्षांचे नेते, कार्यकर्ते दुपारच्या भर उन्हात मतदारांना मार्गदर्शन करताना दिसत होते. अनेक नव मतदारांनी उत्साहात मतदान केले. या केंद्रावर मतदार यादीतील मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याची माहिती सरपंच राहुल हेलोडे यांनी बोलताना सांगितले आहे.या मतदान केंद्रावर ८१%५२ टक्के मतदान झाले. या केंद्रावर पोलीस बंदोबस्त फर्दापूर पोलिस ठाण्याचे सपोनि प्रफुल्ल साबळे व उपनिरीक्षक सुग्रीव चाथे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.पोलिस बंदोबस्त असल्याने किरकोळ घटना वगळता कुठलाच अनुचित प्रकार फर्दापूर परिसरात घडला नसल्याची माहिती प्रा मदन डोखळे यांनी बोलताना दिली.



# विधवा-विधुरांच्या पाद्यपूजनाने गृहप्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** विधवा, विधुर यांना समाजात दुय्यम स्थान दिले जातानाचा अनुभव तसा नेहमीचाच. परंतु कागल तालुक्यातील सोनाळी येथील एका सेवानिवृत्ती शिक्षकांनी हे बंध तोडून देत विधवा, विदुर यांच्या हस्ते गृहप्रवेश करून पुरोगामी विचारसरणीचा पायंडा पाडला. त्यांच्या या उपक्रमाचे जिल्ह्यात स्वागत, कौतुक होत आहे.
जिल्ह्यातील हेरवाड ग्रामपंचायतीने पतीच्या निधनानंतर त्याच्या पत्नीला पार पाडाव्या लागणाऱ्या अनिष्ट प्रथा बंद करण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी घेतला होता.
आता याच्या पुढे एक पाय टाकत सोनाळी (ता. कागल) येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक पी.व्ही. पाटील व त्यांच्या कुटुंबाने आपल्या नवीन वास्तूचा गृहप्रवेश विधवा महिला आणि विधुरांचे पाद्यपुजन करुन साजरा करत समाजासमोर नवा आदर्श निर्माण केला आहे.
शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात पी. व्ही. पाटील यांनी योगदान देत मुख्याध्यापक म्हणून २८ वर्षे काम केले. बिद्री ( ता. कागल ) येथील भारतमाता हायस्कूल या शाळेतून ते ३१ मे २०२३ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांनी सोनाळी गावी बांधलेल्या नवीन वास्तूच्या गृहप्रवेशावेळी पारंपारिक रुढी, परंपरांना फाटा देत कुठल्याही मंगल कार्यापासून वंचित ठेवल्या जाणाऱ्या विधवांना तसेच विधुरांना सामावून घेण्याचे ठरवले. त्यांच्या या निर्णयाला त्यांच्या वयोवृद्ध आई, पत्नी, मुले आणि सुना या सर्वांनीच पाठिंबा दिला. पतीचे अकाली निधन झालेल्या गावातील विधवा महिला आणि संसाराच्या अर्ध्या वाटेवर पत्नीची साथ सुटलेल्या विधुरांना पाटील कुटुंबियांनी वास्तुशांतीसाठी आग्रहाचे निमंत्रण दिले. नव्या घरात त्यांचे पाद्यपुजन करुन या सर्वांच्या उपस्थितीत पाटील कुटुंबाने गृहप्रवेश केला. यावेळी सर्व पाटील कुटुंबीय उपस्थित होते. अनिष्ट रुढींच्या गर्तेत अडकलेला समाज काय म्हणेल याचा क्षणभरही विचार न करता पी. व्ही. पाटील यांनी आपला गृहप्रवेश विधवांच्या हस्ते संपन्न केला. त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# खात्रीच्या ओरिजिनल हापूस आंब्यांसाठी राजू आंबेवाले

आधुनिक केसरी न्यूज

**संभाजीनगर :** सेवन हिल चौकाच्या जवळ गेल्या २० वर्षापासून



देवगड हापूस.. रत्नागिरी हापूस आंबा विक्री करणारे खात्रीचे ओरिजनल आंबेवाले म्हणजे राजू अंबेवाले हे एक समीकरण झालेला आहे. राजू आंबेवाले यांचेकडे  रत्नागिरी. देवगड खात्रीशीर आंबा मिळतो म्हणून लोकांची गर्दी या ठिकाणी होत असते.
रत्नागिरी देवगड येथील आमराई मध्ये खरेदी करून थेट संभाजीनगर मधील खवय्यांसाठी आंबा विक्री करणारे राजू आंबेवाले म्हणून त्यांचा नावलौकिक झालेला आहे. ग्राहकाचे विश्वासाचे नाते त्यांनी जपलेले आहे त्यामुळेच  त्यांचे ग्राहक फोनवरनं ऑर्डर देऊन आपल्या घरी आंबा मागवतात हाच विश्वास मी दोन दशकात कमावलेल्या आहे असेही राजू आंबेवाले अभिमानाने सांगतात.  आपणही घरपोच हापूस आंब्याची खरेदी करण्यासाठी राजू आंबेवाले यांना मोबाईल करु शकता.
**राजू आंबेवाले मो.नं.9867938797**




## महानोरवस्ती शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी २०२४ मध्ये इयत्ता पाचवी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. नुकताच या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. खडका येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महानोर वस्ती या शाळेतील हर्षदा मच्छिंद्र कोळेकर व कार्तिकी प्रशांत नन्नवरे या दोन विद्यार्थीनी इयत्ता पाचवी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाल्या आहेत. या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका जयश्री उबाळे व वर्गशिक्षक चंद्रकांत पालवे यांनी मार्गदर्शन केले. गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड,केंद्रप्रमुख संजय शेळके, सरपंच संदीप सोनकांबळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष किशोर महानोर व शिक्षकमित्र संतोष ढोले यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.




# छत्रपती शिवरायांचा अर्धाकृती पुतळा बसवण्यासाठी समिती स्थापन

आधुनिक केसरी न्यूज



**कळंब :** तालुक्यातील सातेफळ येथे नुकतीच ग्रामसभा घेण्यात आली असून गेली वीस पंचवीस वर्षे छत्रपती शिवरायांचा फोटो आणि झेंडा मारुती मंदिरासमोर स्थापन करण्यात आला होता. त्याच ठिकाणी छत्रपती शिवरायांचा अर्धाकृती पुतळा बसवण्याचे एकमताने ठरवण्यात आले. याप्रसंगी छत्रपती शिवराय पुतळा निर्माण समितीची निवड करण्यात आली. या समितीमध्ये भूमिपुत्र वाघ, डॉक्टर भाऊसाहेब उगले, वैभव गरड, रंजित जगताप, रवी उगले, अजित वाघमारे, महावीर डोके याची एकमताने निवड करण्यात आली. घेण्यात आलेला निर्णय माहिती संकलन आणि प्रस्ताव तयार करणे. तो दाखल करण्याची मुख्य जबाबदारी. वैभव गरड आणि रणजित जगताप यांनी घेतली. वरील प्रमाणे एकमताने दोन निर्णय घेण्यात आले. सूत्रसंचालन आणि आभार महावीर डोके यांनी मानले.

# येरमाळा पत्रकार संघाची स्वप्नपूर्ती

आधुनिक केसरी न्यूज



**कळंब :** येरमाळा येथील अभ्यासिका, व्यायामशाळेच्या इमारतीचे माजी सरपंच विकास बारकूल यांच्या हस्ते भूमिपूजन डिसेंबर महिन्यात ग्रामविकास मंत्रालयाने येरमाळा पत्रकार बहुउद्देशीय सामाजिक संस्थेला पन्नास लाख रुपये निधी मंजूर झाला होता. विद्यार्थीदशेत लहान पणापासुन अभ्यास सोडुन आवांतर वाचनाची खुप आवड, शिकता शिकता विविध सामाजिक संघटनेत पूर्णवेळ कामही केले. वाढत्या वयात सामाजिक कार्याची आवडही लागली. गरजूना वाट्टेल तिथं धावून जायची सवय झाली. आजपर्यंत केलेल्या कामाचं सगळंच मांडून इथं ना श्रेय घ्यायचे आहे ना, कोणाचा सन्मान पुरस्कार घ्यायचा आहे.

आपण अनुभवलेल्या अडचणी इतरांना येऊ नये ही नेहमीची सवय येरमाळा गाव तसं आर्थिक दृष्ट्या प्रगतच पण शैक्षणिक वातावरण तसे प्रत्येकाला आवड लागावी असे नव्हते, शैक्षणिक व्यवस्थेला दोष देण्यापेक्षा आपण ती सुधारण्यासाठी व्यक्तिगत काय प्रयत्न करू शकतो याचा विचार करुन गावातील शैक्षणिक स्थिती सुधारावी, विद्यार्थ्यांना अभ्यासाची, शैक्षणिक, आवड निर्माण व्हावी, गावातील संघर्षित तरुणांना एक अद्यायावत व्यायामशाळा असावी जेणे करुन तरुण पिढी व्यसनाधिनणते कडे ओढली जाऊ नये. यासाठी गेली वीस वर्ष आपण पत्रकारीतेत कार्यरत आहोत जबाबदार व्यक्ती म्हणून आपण समाजाचे कांही देणे लागतो. यावर सहकारी पत्रकार यांच्याशी नेहमी चर्चा व्हायची गावासाठी एक अभ्यासिका करण्याचा उद्देश होता. गावातील कांही अधिकारी झालेल्या भूमिपुत्रांना संकल्पना सांगितली तेव्हा त्यांनी चांगला उपक्रम आहे. गरज लागेल तिथं सांगा जमेल ते सहकार्य करू आणि या सोबतच व्यायामशाळा ही करण्याचे सुचवले. हेतू चांगला असेल तर तो पूर्ण करण्यासाठी तुमच्या पाठीशी दैवीशक्ती उभी राहते असे म्हणतात. प्रवास तसा कढीन तालुक्याचे जेष्ठ पत्रकार सतीश टोणगे,बालाजी आडसूळ,अशोक शिंदे, शितलकुमार धोंगडे यांच्या सल्ल्याने तशी टप्या टप्याने तयारी केली. ग्रामपंचायतचे माजी सरपंच विकास बारकूल यांनी ग्रामपंचायतची जागा उपलब्ध करुन दिली. अभ्यासिकेची इमारत पूर्ण झाल्यास गावातील विद्यार्थ्यांना स्किल डेव्हलपमेंट, तरुणांना संरक्षण विभागातील नोकरीच्या संधी, मार्गदर्शन,विविध स्पर्धा परीक्षा क्लासेस तीन तीन महिण्याचे कोर्ससाठी स्वामी विवेकानंद विद्यापीठाच्या माध्यमातून देण्याचे विद्यापीठाचे सिनेट संचालक, दूरदर्शन, धाराशिव आकाशवाणी, तरुण भारतचे जिल्हा प्रतिनिधी देविदास पाठक यांनी शब्द दिला आहे. शिवाय महिलांना शिवनक्लास, ब्युटी पार्लर घरगुती रोजगार, निर्मिती प्रशिक्षण देण्याचे काम तुम्ही करु शकता तसे लागेल ते सहकार्य करण्याचे त्यांनी मान्य केले आहे. संघातील सहकारी सचिन बारकूल, दत्ता बारकूल, दत्ता गायके, सुखदेव गायके, सुधीर लोमटे, मिलिंद देशमुख यांनी मोलाची एक जीवाने साथ दिली त्यामुळे हे साध्य झाले.

या उपक्रमाच्या प्रक्रियेत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष योगदान देणाऱ्या लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, राजकीय पदाधिकारी यांचे शब्द सुमनाने आभार.

# छत्रपतींचा अपमान करणाऱ्या महाराष्ट्रद्रोह्यांना धडा शिकवल्या शिवाय मराठी माणूस स्वस्थ बसणार नाही : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षाकडून सातत्याने केला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यसभा खासदार प्रफुल्ल पटेल यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डोक्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा जिरेटोप चढवून छत्रपती शिवाजी महाराज व त्यांना मानणा-या करोडो शिवभक्तांचा अपमान केला आहे. या अपमानाबद्दल प्रफुल्ल पटेल यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. यासंदर्भात प्रतिक्रीया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे आपले दैवत आहेत पण या दैवताचा सातत्याने अपमान केला जात आहे. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, भापजाचा प्रवक्ता सुधांशु त्रिवेदी, मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्यासह अनेकांनी महाराजांचा अपमान केला पण भारतीय जनता पक्षाने त्यावर चकार शब्द काढला नाही. अयोध्यातील राम मंदिर उद्घाटन सोहळ्यातही श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष गोविंदगिरी महाराजांनी नरेंद्र मोदी यांची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केली होती. असे प्रकार शिवाजी महाराजांचा अपमान करणारे आहेत, त्याला आळा घातला पाहिजे पण त्यात भरच पडत आहे. अंडरवर्ल्ड माफिया दाऊद इब्राहिमचा निकटवर्तीय इकबाल मिर्चीसोबत खासदार प्रफुल्ल पटेल यांनी जमीन व्यवहार केल्याप्रकरणी ईडीकडून चौकशी झाली होती. देशद्रोह्याची संबंध असलेल्या प्रफुल्ल पटेलचे पापी हात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जिरेटोपला लागले हे लाजिरवाणे आहे. या घटनेचा काँग्रेस पक्ष तीव्र शब्दात निषेध करत आहे, असेही नाना पटोले म्हणाले.

# संविधान वाचवण्यासाठी काँग्रेसला पुरोगामी संघटनांचा पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** काँग्रेसच्या काळात संविधानाचा गैरवापर जास्त नव्हता आता संविधाच्या पलीकडे जाऊन चुकीच्या पद्धतीनेने काम सुरु आहे सामान्य व क्षेत्राच्या लोकांवर दबाव टाकून हुकूमशाही सारखी वागणूक होत आहे. त्या साठी होत असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमच्या पुरोगामी संघटनेतर्फे इंडिया आघाडीच्या लोकसभा मतदारसंघाच्या काँग्रेस उमेदवार डॉ. शोभाताई बच्छाव यांना पाठिंबा देण्यात आला.
भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दहा वर्षाच्या काळात भारतातील लोकशाही व भारताची राज्यघटना पूर्णपणे धोक्यात आली आहे त्यामुळे मोदी व त्यांच्या भारतीय जनता पक्षाच्या या लोकसभा निवडणुकीत पूर्णपणे पराभव झाला पाहिजे असे या पत्रकार परिषदमध्ये सांगण्यात आले. विकसित व विकसनशील देशाच्या तुलनेत भारतीयांचे दरडोई उत्पन्न फारच कमी झाले असून मोदी सरकारने कष्टकरी, शेतकरी कंत्राटी कामगार, रोजंदारी कामगार यांच्या श्रमावर सत्ताधारी वर्गाला मोठी संपत्ती जमा करण्यास मदत केली आहे त्यामुळे भाजपचे मित्र अंबानी -आदानी यांना मदत झाली आहे असा आरोप या ठिकाणी करण्यात आला आहे. मोदिंच्या नेतृत्त्व दहा वर्षांत देशात महिलांवर, दलितांवर, अल्पसंख्यांक व आदिवासींवर होणाऱ्या अन्यायांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे,जीएसटीमुळे छोटे व्यावसायिक, व्यापारी अडचणीत आले असून जीएसटीची कमाई ही बलाढ्य श्रीमंतांकडे वळवण्यात आली आहे, २०१४ व २०१९ च्या निवडणुकीमध्ये लोकांनी भाजपच्या सबका साथ सबका विकास धोषणेला भुलून मतदान केले होते. जनतेला अपेक्षा होती की, सर्वांच्या सोबत सर्वांचा विकास होईल. आपल्या या घोषणेला अनुसरून मोदींनी २०१४ मध्ये प्रत्येक वर्षी २ कोटी नोकऱ्या देण्याची ग्यारंटी दिली होती. मात्र लोकांना कुठल्याच प्रकारच्या नोकऱ्या दिल्या नाहीत असेही या ठिकाणी सांगण्यात आले.भारतात शेतकऱ्यांविरोध व कामगार विरोधी कायद्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढण्यास भाजपा सरकार जबाबदार आहे असा आरोप या ठिकाणी करण्यात आला. भाजप सरकार सत्तेतून हद्दपार करणे आवश्यक आहे. त्यासाठी असंख्य संस्था पाठिंबा जाहीर करत आहेत त्यात महा. अंनिसचे राज्याध्यक्ष अविनाश पाटील, प्लॅटफॉर्म फॉर सोशल जस्टीसचे डॉ. जालिंदर अडसुळे, महा. अनिंसचे धुळे जिल्हाध्यक्ष ॲड. जे. टी. देसले, गो. पि. लांडगे, सीटूचे कॉ. एल. आर. राव, जमिअत ए इस्लामी हिंदचे जिल्हाध्यक्ष असिम शेख, सचिव शोएब मिर्झा, आबिद शेख, इसहाक शेख, नगर राज समर्थन मंचचे रामदास जगताप, नामदेवराव येवले, मोहन मोरे, भारत जोडो अभियानचे जिल्हा समन्वयक विशाल वानखेडे, शहाजी शिंदे, नितीन बागूल, मोहन मोरे, कॉ. पोपटराव चौधरी हैं. जे. टी. देसले, बी. ए. पाटील, डॉ. जगदीश पाखरे, डॉ. सदाशिव सूर्यवंशी, रचना अडसुळे, विशाल महाले, प्रा. शरद पाटील, रणजित शिंदे, आनंद जावडेकर, विशाल वानखेडे, हेमंत भडक, डॉ. मनोज राका, डॉ. संतोष सदावर्ते, श्रीकृष्ण बेडसे, ॲड. विशाल साळवे, ईकबाल शेख, इरफान शेख, अफसाना, नईम शेख, डॉ. प्रसेनदीप बैसाणे, प्रभाकर सूर्यवंशी, ईश्वर मोहिते, डॉ. कृष्णा मोरे, आदी संघटना, संस्थांनी पाठिंबा दर्शविला आहे.

# रेन वॉटर हार्वेस्टींगसाठी १४ जलमित्रांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महानगरपालिकेतर्फे रेन वॉटर हार्वेस्टींगची जनजागृती करण्यास स्वेच्छेने काम करणाऱ्या १४ जलमित्रांची निवड करण्यात आली असुन सर्व जलमित्रांना त्यांचे नियुक्ती पत्र १४ मे रोजी मनपा सभागृहात झालेल्या कार्यक्रमात आयुक्त तथा प्रशासक विपीन पालीवाल यांच्या हस्ते देण्यात आले.

रेन वॉटर हार्वेस्टींगची जनजागृती करण्यास स्वेच्छेने काम करणारे जलमित्र मनपाद्वारे नेमले जात आहेत.जलमित्र म्हणुन काम करतांना त्यांच्या वॉर्ड मध्ये जनजागृती करून परीसरातील घरांमध्ये रेन वॉटर हार्वेस्टींग करून उत्कृष्ट काम करणाऱ्यांना पुरस्कृत केले जाणार आहे. जलमित्राच्या प्रयत्नांनी त्यांच्या परिसरात ११ घरी रेन वॉटर हार्वेस्टींग केल्यास जलमित्र, २१ घरी केल्यास सिल्वर जलमित्र,५१ घरी केल्यास गोल्डन, ७१ घरी केल्यास डायमंड तर १०१ घरी रेन वॉटर हार्वेस्टींग केल्यास नगर जलमित्र या पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे. पावसाद्वारे मिळणारे पाणी वाचविण्यास प्रत्येक घरी रेन वॉटर हार्वेस्टींग केले जावे यासाठी मनपा प्रयत्नशील असुन ७० वॉर्डसखींद्वारे घरोघरी माहितीपत्रक देणे तसेच विहीर / बोअरवेल असलेल्या घरी दंड करण्याच्या नोटीस देण्याचे काम सुरु आहे. हार्वेस्टींग करण्यास घराच्या छताच्या क्षेत्रफळानुसार ५,७ व १० हजार रुपये अनुदान दिले जाते तसेच पुढील ३ वर्षे मालमत्ता करात २ टक्के सूट सुद्धा देण्यात येते तसेच नविन बांधकाम करण्यास परवानगी घेणाऱ्या बांधकामधारकांना रेन वॉटर हार्वेस्टींग करणे सक्तीचे केले गेले आहे..

या कार्यक्रमात अनिल टहलियानी,सविता खाडे,स्मिता रेबनकर,माया खनके,मंगला रुद्रपवार,प्रज्ञा बोरगमवार,आशाताई दूधपचारे,पायल अदलवार,वंदना राधापवार,अनघा येनारकर,अपर्णा चिडे,सुनीता दाणी ,सिमरन खिचडे,ज्योति कुंभारे या १४ स्वयंसेवकांना स्वेच्छेने जलमित्र म्हणुन काम करीत असल्याचे नियुक्तीपत्र देण्यात आले. या जलमित्रांनी स्वतः रेन वॉटर हार्वेस्टींग केले असुन इतरांनाही रेन वॉटर हार्वेस्टींग करण्यास प्रेरीत करत आहेत.याप्रसंगी उपायुक्त रवींद्र भेलावे,स्वयंसेवी संस्था,नियुक्त कंत्राटदार व मनपा अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.



# शैक्षणिक कामाकरिता लागणारे दाखले वेळेपूर्वी काढून घ्या

## जिल्हाधिकाऱ्यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सीबीएसई बोर्डाचा इयत्ता 10 वी आणि 12 वी चा निकाल नुकताच लागला आहे. जून महिन्यात स्टेट बोर्डाचा निकाल लागणार असून पुढील शैक्षणिक सत्रात विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी विविध प्रकारच्या दाखल्यांची आवश्यकता पडणार आहे. त्यामुळे शैक्षणिक कामाकरीता लागणारे आवश्यक दाखले वेळेपूर्वीच काढून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, भूमीहिन प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र अशा विविध प्रकारच्या दाखल्यांची आवश्यकता असते. दाखले वेळेवर न मिळाल्यास विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी नाहक अडचणींचा सामना करावा लागू शकतो तसेच पालकांना वेळेवर धावपळ करावी लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांनी अगोदरच त्यांच्या मुलांना शिक्षणासाठी लागणारी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे / दाखले आताच काढून घ्यावे व ऐनवेळेवर होणारा त्रास टाळावा. परिक्षांचे निकाल लागल्यानंतर विविध दाखले काढण्यासाठी विद्यार्थ्यांची 'आपले सरकार सेवा केंद्रात' तसेच तहसील कार्यालयात एकच गर्दी होते. त्यामुळे वेळेत दाखले मिळण्यास विलंब होऊ शकतो. कधीकधी तांत्रिक अडचणीसुध्दा उद्‌भवू शकतात. हा विलंब व त्रास टाळण्यासाठी वेळेपूर्वीच उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, भूमीहिन प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र नजीकचे आपले सरकार सेवा केंद्र, ग्रामपंचायत सेवा केंद्र, तालुका स्तरावरील सेतू केंद्रातून दाखल्यांसाठी अर्ज करावा व रितसर दाखल्यांची पोचपावती घ्यावी. शैक्षणिक कामाकरीता आवश्यक असणारे सर्व दाखले पालकांनी वेळेपूर्वीच प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

# मान्सूनपूर्व शहरातील नाले स्वच्छ करण्यात यावे



आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** मान्सूनपुर्व शहरातील नाले स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी मनसे शहर अध्यक्ष उमेश कुंडले यांनी केले आहे.
मान्सूनपुर्व शहरातील नाले स्वच्छता मोहीम नगर परिषद ने राबवावी. याकरीता मनसे शहर अध्यक्ष उमेश कुंडले यांच्या नेतृत्वात मुख्याधिकारी तथा प्रशासक नगर परिषद यांना देण्यात आले. त्यांच्या अनुपस्थित उपमुख्याधिकारी यशवंत कातकर यांना निवेदन सादर केले. यावेळी मनसे जिल्हा उपाध्यक्ष विष्णू बूजोने, तालुका अध्यक्ष गोपाळ मोहुर्ले, शहर महिला आघाड़ी अध्यक्ष अरुणा तोडसाम, विजेंद्र परमार, कुणाल सहारे, राहुल कामटवार, चेतन मंगाम, बादल मेश्राम, लोकेश कुरेकर, मोहन राजभर, योगराज चौधरी, राजेश कोणपतीवर तसेच मनसे कार्यकर्ते उपस्थित होते.

# अवैध होर्डिंग धारकांवर सक्त कारवाईचे आयुक्तांचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शहरातील जेवढेही अवैध होर्डिंगधारक आहेत त्यांनी त्यांचे अवैध होर्डिंग २४ तासाच्या आत काढले नाही तर त्यांच्यावर निष्कासनाची तसेच दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त तथा प्रशासक विपीन पालीवाल यांनी दिले आहेत.

मुंबई येथील होर्डिंग दुर्घटना पार्श्वभुमीवर अवैध होर्डिंगसंबंधी आढावा बैठक आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली मनपात आयोजीत करण्यात आली होती. शहरातील जेवढेही अवैध होर्डिंगधारक आहेत त्यांना मनपातर्फे होर्डिंग काढण्याच्या नोटीस यापुर्वी बजावण्यात आल्या आहेत. मात्र आता २४ तासाच्या आत जर होर्डिंगधारकांनी त्यांचे अवैध होर्डिंग काढले नाही तर मनपातर्फे निष्कासनाची तसेच दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. निष्कासनाची कारवाई करतांना जो काही खर्च लागेल तो या होर्डिंगधारकांकडुन वसूल केला जाणार आहे.

महानगरपालिका हद्दीत डिजिटल पोस्टर्स, जाहिरातीची होर्डिंग, बॅनर उभारतांना मनपाकडून रीतसर परवानगी घेऊन यासंबंधी आकारण्यात येणारा टॅक्स भरणे आवश्यक असते. मात्र अनेकदा परवानगी न घेता होर्डिंग उभारण्यात येते व आवश्यक ती काळजी न घेतल्यास अपघात होण्याची शक्यता असते.

# केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांना मातृशोक

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या आई माधवीराजे यांचे बुधवारी सकाळी दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) येथे निधन झाले. 'पीटीआय'नं दिलेल्या माहितीनुसार आज सकाळी 9 वाजून 28 मिनिटांनी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून त्या 'व्हेंटिलेटर'वर होत्या. गेल्या तीन महिन्यांपासून त्यांच्यावर एम्समध्ये उपचार सुरू होते. त्यांना न्यूमोनिया तसेच सेप्सिसचा त्रास होता. माधवीराजे यांच्या निधनावर मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी शोक व्यक्त केला. त्यांनी ट्विटरवर माधवी राजे यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे की, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे जी यांच्या पूज्य माता श्रीमती माधवी राजे शिंदे यांच्या निधनाची हृदयद्रावक बातमी मिळाली. आई हाच जीवनाचा आधार आहे. मृत्यू हे एक अपरिमित नुकसान आहे. माधवीराजे यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर येथे आणण्यात येणार आहे. माधवीराजे या नेपाळच्या राजघराण्यातील होत्या. समाजसेवेत त्या खूप सक्रिय होत्या. माधवीराजे या 24 चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा होत्या. हे ट्रस्ट शिक्षण आणि वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. त्या शिंदे गर्ल्स स्कूलच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सच्या अध्यक्षाही होत्या. दिवंगत पती माधवराव शिंदे यांच्या स्मरणार्थ पॅलेस म्युझियममध्ये एक गॅलरीही बांधली आहे. ज्योतिरादित्य शिंदे यांच्या आई माधवीराजे यांच्यावर गुरुवारी ग्वाल्हेरमध्ये अंत्यसंस्कार केले जाऊ शकतात. गेल्या दोन महिन्यांपासून केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे आणि त्यांची पत्नी आणि मुलगा लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी गुणा-अशोकनगर आणि शिवपुरी येथे होते.

# उद्धव ठाकरे यांची प्रचारसभा मुसळधार पावसामुळे रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**डोंबिवली :** महाविकास आघाडीच्या कल्याण लोकसभा मतदारसंघातील उमेदवार वैशाली दरेकर यांच्या प्रचारानिमित्त डोंबिवलीत सोमवारी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा आयोजित केली होती. सोमवारी दुपारी चार वाजता शहर परिसरात मुसळधार पाऊस पडल्याने सभा आयोजित भागशाळा मैदानात चिखल झाला. त्यामुळे सभा रद्द करण्यात आली आहे, अशी माहिती उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण लोकसभा संपर्कप्रमुख सदानंद थरवळ यांनी दिली.

# निकालानंतर एकनाथ शिंदे, अजित पवार अग्नीवीर ठरतील

## काँग्रेस आमदार कैलास गोरंट्याल यांचे भाकीत

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** देशभरात पार पडत असलेल्या लोकसभा निवडणुकीची मतमोजणी येत्या ४ जून रोजी होणार आहे.या निवडणुकीचे निकाल जसे समोर येईल त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे दोन्ही नेते अग्निविर ठरतील. निकालानंतर भाजपा सुद्धा त्यांना दूर सारतील असे भाकीत काँग्रेसचे जालन्यातील आमदार कैलास गोरंटयाल यांनी आज मंगळवारी येथे बोलतांना व्यक्त केले.

जालना लोकसभेसाठी काल सोमवारी मतदार संघात ६९.१८ टक्के असे उत्स्फूर्त मतदान झाले आहे. या वाढलेल्या मतांचा लाभ नेमका कुणाला होईल असे उपस्थीत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देतांना ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही



पक्ष ज्या पद्धतीने फोडले, आमदार फोडले आणि चिन्हंही पळवल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार हे व्हिलन ठरले असून या सर्व घडामोडी पाठीमागे भाजपाचा हात असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपा विषयी सर्वसामान्य जनतेत मोठी चीड निर्माण झाली. हे सर्वसामान्य नाराज मतदार महाविकास आघाडीच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहिला. महागाई, बेरोजगारी, शेतकरी, मजूर, कामगारांचे प्रश्न सोडविण्यात आलेले अपयश, केंद्र, राज्यातील सरकारची जुमलेबाजी, मराठा, ओबीसी, मुस्लिम समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा यातून केंद्र आणि राज्यातील सरकारविरुद्ध जनतेत मोठा रोष निर्माण झाल्याने शेतकऱ्यांसह सर्व सामान्य जनतेने या निवडणुकीत महाविकास आघाडीला साथ देण्याचा निर्णय घेतला असल्याचे झालेल्या उत्स्फूर्त मतदानातून दिसून येत असल्याचे स्पष्ट करून आ. गोरंट्याल म्हणाले की, आमच्या महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे यांच्या विजयासाठी महाविकास आघाडीतील घटक पक्षाचे सर्व नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी नियोजनबद्ध प्रचार यंत्रणा राबवून त्यांच्या विजयासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले आहेत. ही निवडणूक एकतर्फी होईल असे भाजपाला सुरुवातीला वाटत होते. मात्र,जनतेचा कल आपल्या विरुद्ध असल्याचे दिसून आल्यानंतर त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जाहीर सभा जालन्यात घेतल्या. मात्र त्याचा काहीही फरक पडणार नाही. शिवाय भाजपाचे मित्रपक्ष असलेल्या सिल्लोड आणि जालन्यातील मलिदा सम्राटांनी रावसाहेब दानवे यांच्याविरुद्ध काम केल्याची चर्चा आहे.तसे जर खरच झाले असेल तर दानवे यांचा पराभव निश्चित असल्याचे सांगून आमचे उमेदवार डॉ.कल्याण काळे यांच्या विजयाच्या संदर्भात सध्या आम्ही जो अंदाज व्यक्त करत आहोत त्यापेक्षा अधिक मताधिक्याने विजयी होतील असा विश्वास आ.कैलास गोरंट्याल यांनी पत्रकारांशी बोलतांना व्यक्त केला आहे.

**भाजपाला श्रीरामांची नाराजी भोवणार :** अयोध्येत उभारण्यात आलेल्या श्री राम मंदिराचे लोकार्पण केल्यानंतर मागील दोन लोकसभा निवडणुकी सारखे वातावरण देशात निर्माण होईल अशी खात्री भाजपाला होती .त्यामुळेच श्रीराम मंदिराचे लोकार्पण करण्यासाठी भाजपाने घाई केल्याचे आ .कैलास गोरंटयाल म्हणाले .ज्या दिवशी लोकार्पण करण्यात आले त्या दिवशीचा मुहूर्त बरोबर नाही,शिवाय मंदिराचे बांधकाम अद्याप पूर्ण झालेले नसल्याने आणि हिंदू शास्त्रानुसार श्रीराम मंदिराचे लोकार्पण करण्यासाठी हिंदू धर्मात सर्वोच्च असणाऱ्या चार शंकराचार्यांनी विरोध दर्शवला होता .मात्र,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या विरोधाला जुमानले नाही .ज्या श्रीरामांचे नावं घेवून आतापर्यंत सत्ता भोगली त्याच श्रीरामांची नाराजी भाजपाला आता भोगावी लागणार असल्याचा टोला आ .कैलास गोरंटयाल यांनी यावेळी बोलतांना लगावला आहे .



## डॉ. वर्षा कस्तुरकर यांचा कंपनीच्या संचालक पदाच्या निवडणुकीत विजय

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** येथील डॉ. वर्षा कस्तुरकर यांचा देशभरातील खत निर्मिती उद्योगातील सर्वात मोठी इफको कंपनीच्या संचालक पदाच्या निवडणुकीत विजय झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. देश पातळीवरील संचालक मंडळाच्या या निवडणुकीत धाराशिव सारख्या मागास जिल्ह्यातील महिलेला सहकार भारतीच्या माध्यमातून पहिल्यांदाच ही संधी मिळाली आहे. इफको कंपनीच्या 21 संचालकाची निवडणूक घेतली जाते. यात आठ प्रतिनिधी राज्य मार्केटिंग फेडरेशन कडून निवडले जातात. तर 12 देशातील राजांच्या प्रतिनिधी म्हणून निवडले जातात. देश पातळीवरील या संचालक मंडळात एका महिला संचालकाचा समावेश असतो.या निवडणुकीत डॉ. वर्षा लक्ष्मीचंद कस्तुरकर यांना 50 महिला प्रतिनिधींनी मतदान केले व त्यांनी साधना जाधव यांचा मोठा पराभव केला आहे.

देश पातळीवर सगळ्यात मोठी खत निर्मिती आणि या उद्योगातील नामांकित कंपनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ही इफकोच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत डॉ. वर्षा कस्तुरकर यांच्या विजयाबद्दल रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी, बालाघाट मल्टीस्टेट कळंब, तसेच सकल कळंबकर यांच्या वतीने मोठा सत्कार करण्यात आला. या निवडणुकीत यश मिळवण्यासाठी लक्ष्मीचंद कस्तुरकर, संजय देवडा, संदीप बाविकर आदींनी मोठी मेहनत घेतली होती.

## रेल्वेचा फेरीवाल्यांवर दंडुका! खाद्यपदार्थ अन् पाण्याच्या बाटल्यांच्या विक्रीवरही नजर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** रेल्वे गाड्या आणि स्थानकांमध्ये अनधिकृत फेरीवाले मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. या अनधिकृत फेरीवाल्यांकडून प्रामुख्याने खाद्यपदार्थांची विक्री केली जात आहे. हे खाद्यपदार्थ चांगल्या दर्जाचे नसल्यामुळे प्रवाशांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे आता रेल्वे सुरक्षा दलासह वाणिज्य विभागाने अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई सुरू केली आहे. यामध्ये ५६० फेरीवाल्यांना पकडून त्यांच्याकडून तीन लाखांहून अधिक दंड वसूल करण्यात आला आहे. मध्य रेल्वेमध्ये रेल्वे सुरक्षा दल आणि रेल्वेच्या वाणिज्य विभागाने गाड्या, स्थानके आणि फलाटावर अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्ध कारवाईची मोहीम राबवली. त्यात पुणे, दौंड, मिरज, सातारा, अहमदनगर, कोपरगाव, बेलापूर या प्रमुख स्थानकांवर कारवाई करण्यात आली. विनापरवाना खाद्यपदार्थ, बाटलीबंद पाणी विकणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाईचा दंडुका उगारण्यात आला.

या मोहिमेमध्ये २७ एप्रिल ते १२ मे या कालावधीत ५६० फेरीवाल्यांना पकडण्यात आले. त्यातील ३५१ फेरीवाल्यांवर न्यायालयात खटला दाखल करून त्यांच्याकडून तीन लाख १७ हजार ४२५ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच फेरीवाल्यांकडून एक हजार ९४५ पाण्याच्या बाटल्या जप्त



करण्यात आल्या आहेत. याशिवाय रेल्वेच्या अधिकृत स्टॉलवर खाद्यपदार्थ आणि पाण्याच्या बाटल्यांची जास्त किमतीने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांकडून ६० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. पुणे रेल्वे स्थानक परिसरात अनेक विक्रेते छापील कमाल किमतीऐवजी जास्त पैसे प्रवाशांकडून उकळत आहेत. त्याचबरोबर अनधिकृत कंपन्यांच्या उत्पादनांची विक्री केली जात असल्याच्या तक्रारी अनेक प्रवाशांनी केल्या आहेत. पाण्याच्या बाटलीची विक्रीही जादा दराने केली जात असल्याचे अनेक प्रवाशांनी रेल्वे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे प्रवाशांची लूट करणारे विक्रेते आणि फेरीवाले यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.




## शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम त्वरित द्या : अप्पर जिल्हाधिकारी देशपांडेंना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सन २०२२-२०२३ या वर्षाचे नुकसान भरपाई झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम त्वरित मिळावी अशी मागणी भूमिपुत्र संघटनेचे दिनेश दादापाटील चोखारे यांनी केली आहे. भूमिपुत्र संघटनेचे आज अप्पर जिल्हाधिकारी देशपांडे यांना निवेदन सादर केले. त्यात त्यांनी म्हटले आहे कि, संपूर्ण जिल्ह्यात सन 2022-23 मोठ्या प्रमाणात पूर बाधित शेतकऱ्याच्या पिकाचे नुकसान झाले होते. शासनाने यादीत तयार करताना प्रत्येक तालुक्यावर यादी तयार केली होती. शासनाचे नवीन धोरणानुसार E-KYC करणे गरजेचे होते. अनेक शेतकऱ्यांना E-KYC ची माहिती नसल्याने E-KYC करणे बाकी आहे,

नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सुद्धा अजूनपर्यंत E-KYC केली नसल्याने आर्थिक मदत मिळाली नाही आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांनी E-KYC केली त्याना सुध्दा अजून पर्यत आर्थिक मदत मिळाली नाही , लवकरात लवकर आर्थिक मदत मिळवून देण्यात यावी. शेतकऱ्यांना आपल्या माध्यमातून E-KYC करण्यासाठी आपल्या स्तरावरून शेतकऱ्यांना माहिती देऊन ,E KYC करण्यास मदत करावी अशी मागणी निवेदनातून केली आहे. निवेदन देतांना सचिन राजूरकर, गणेश आवारी, प्रमोद बोरीकर, यांनी उपस्थिती होती.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# मान्सूनपूर्व नाले स्वच्छता मोहीमेची पाहणी

## कामाला वेग देण्याचे उपायुक्तांचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शहर महानगरपालिकेच्या वतीने मान्सूनपूर्व नाले स्वच्छता अभियान राबविण्यात येत असुन सदर मोहीमेची उपायुक्त रवींद्र भेलावे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान उपायुक्तांनी स्वच्छता कामगारांना वेळेत काम करण्याच्या सूचना दिल्या तसेच वेळप्रसंगी अतिरिक्त मशीन लावुन काम पूर्ण करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.भारतीय हवामान खात्याने यावर्षी सरासरीहून अधिक पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. तसेच हवामान बदलांमुळे ठिकठिकाणी अवकाळी पाऊस पडत असल्याचे लक्षात घेऊन महापालिका आयुक्त तथा प्रशासक विपीन पालीवाल यांच्या मार्गदर्शनानुसार पावसाळापूर्व गटार सफाई कामे मे महिन्यापासुन सुरु करण्यात आलेली आहेत. अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील व उपायुक्त रवींद्र भेलावे यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणात सफाई मोहिम सुरु असुन १२० सफाई कर्मचारी, ३ जेसीबी, २ पोकलेन, गाळ वाहतुकीसाठी ६ ट्रॅक्टरद्वारे नैसर्गिक मोठ्या नाल्यांच्या साफसफाईची कामे तसेच बंदिस्त गटारे साफसफाईची कामे करण्यात येत आहेत.  नाले स्वच्छता अभियानाअंतर्गत नाल्यांची रूंदी व खोली पूर्णपणे स्वच्छ करून पावसाळी पाणी वाहण्याकरिता सुरळीत प्रवाह करण्यात येत असुन याद्वारे वाहणाऱ्या पाण्याची क्षमता वाढेल आणि नाल्यांच्या काठावर असलेल्या वस्त्यांत पावसाळ्यात येणाऱ्या पूरापासून सुरक्षा प्रदान होईल. शहरातील मोठ्या नाल्यांची तसेच लहान नाल्यांची साफ सफाई सुरू असून, मनुष्यबळ व जेसीबीच्या मदतीने गाळ आणि कचरा बाहेर काढण्यात येत आहे. तसेच नाल्याभोवती वाढलेली झाडेझुडपी व नाल्यातील दगड बाहेर काढून सांडपाण्याला वाट काढून दिली जात आहे.





# श्री वासवी कन्यका मातेच्या प्राणप्रतिष्ठापना जयंती महोत्सवानिमित्त शोभायात्रेचे स्वागत

## समाज बांधवांसाठी शितपेयाची व्यवस्था

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वासवी कन्यका मातेचा  प्राणप्रतिस्थापना दिन आणि जयंती महोत्सव निमीत्त निघालेल्या शोभायात्रेचे यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने जटपूरा गेट येथे स्वागत करण्यात आले. यावेळी शोभायात्रेत सहभागी समाज बांधवांसाठी यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने शितपेयाची व्यवस्था करण्यात आली होती.या प्रसंगी यंग चांदा ब्रिगेडचे युवा नेते अमोल शेंडे, शहर संघटक विश्वजीत शाहा यांच्यासह यंग चांदा ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

श्री. वासवी कन्यका मातेचा  प्राणप्रतिस्थापना दिन आणि जयंती महोत्सवा निमीत्त आर्य वैश्य समाजाच्या वतीने शहरातुन शोभायात्रा काढण्यात आली. श्री. कन्यका माता मंदिर येथून या शोभायात्रेला सुरवात झाली. सदर शोभायात्रेचे स्वागत करण्यासाठी यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने जटपुरा येथे स्वागत मंच उभारण्यात आले होते. सकाळी साडे नऊ वाजताच्या दरम्यान सदर शोभायात्रा यंग चांदा ब्रिगेडच्या स्वागत मंचाजवळ पोहोचली. यावेळी यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांनी शोभायात्रेचे स्वागत करत श्री. कन्यका माता यांच्या पालखीला माल्यार्पण केले. या प्रसंगी शोभायात्रेत सहभागी समाज बांधवांसाठी यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने शितपेयाची व्यवस्था करण्यात आली होती.

# कारागृह रक्षकांच्या १८०० जागांसाठी पावणेचार लाख उमेदवारांचे अर्ज

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्याच्या गृहमंत्रालयाकडून कारागृह रक्षकांची लवकरच भरती केली जाणार आहे. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर ही प्रक्रिया सुरू होणार असताना अवघ्या १८०० जागांसाठी तब्बल पावणेचार लाख अर्ज आले आहेत. पोलीस दलातील अन्य पदांसाठीही लाखोंच्या संख्येने अर्ज प्राप्त झाले आहेत. राज्यात कारागृह रक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे राज्यातील जवळपास सर्वच कारागृहातील सुरक्षा व्यवस्था वाऱ्यावर आहे. ही बाब लक्षात घेऊन गृहमंत्रालयाने भरती प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला. राज्यभरात १८०० रिक्त जागांसाठी ३ लाख ७२ हजार ३५४ अर्ज प्राप्त झाल्याची माहिती अप्पर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके) राजकुमार व्हटकर यांनी दिली. मैदानी चाचणी आणि लेखी परीक्षेनंतर उमेदवारांची निवड यादी जाहीर करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. याखेरीज गृहमंत्रालयाने राज्य पोलीस दलातील शिपाई, चालक, बँड्समन, राज्य राखीव पोलीस दलातील जवानांची रिक्त पदे भरण्यासही मंजुरी दिली आहे. या १७ हजार ४७१ पदांसाठी तब्बल १७ लाख ७६ हजार अर्ज आले आहेत. यात पोलीस शिपायांच्या ९ हजार ५९५ रिक्त पदांसाठी सर्वाधिक ८ लाख २२ हजार ९८४ अर्ज आले. वाहनचालकाच्या १,६८६ जागांसाठी १ लाख ९८ हजार ३०० युवक-युवतींनी अर्ज केले आहेत.



# शेतकऱ्यांनी ई-केवायसी प्रमाणीकरण व आधार सीडिंग करून घ्यावे

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत लाभ मिळण्यासाठी संबंधित लाभार्थ्यांचे ई-केवायसी प्रमाणीकरण आणि बँक खात्यास आधार संलग्नीकरण (आधार सिडींग) करणे बंधनकारक आहे. त्यामुळे शेतक-यांनी तात्काळ ई-केवायसी आणि आधार सिडींग करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पी.एम. किसान पोर्टलवर प्रलंबित असलेल्या बाबींची पुर्तता करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरील कार्यवाहीचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, कृषी उपसंचालक चंद्रकांत ठाकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) श्याम वाखर्डे, ओरिएंटल विमा कंपनीचे विभागीय व्यवस्थापक अभिषेक अत्रे, विमा कंपनीचे जिल्हा प्रतिनिधी प्रतिक कारपेनवार यांच्यासह कंपनीचे प्रतिनिधी तसेच दूरदृष्यप्रणालीद्वारे तहसीलदार आणि तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, पी.एम. किसान सन्मान निधी अंतर्गत पुढील हप्त्याचा लाभ मिळण्याकरीता संबंधित लाभार्थी शेतक-यांनी ई-केवायसी प्रमाणीकरण आणि आधार सिडींग त्वरीत करून घ्यावे. तसेच तहसीलदारांनी संबंधित लाभार्थ्यांचा, 1 फेब्रुवारी 2019 पुर्वीचा 7/12 बघून त्वरित निपटारा करावा. जेणेकरून कोणीही सन्मान निधीच्या लाभापासून वंचित राहणार नाही. सोबतच तालुकानिहाय माहिती घेऊन ई-केवायसी आणि आधार सिडींग प्राधान्याने करून घ्यावे. जिल्ह्यात मंडळ स्तरावरील हवामानाचा अंदाज



घेणारे सर्व यंत्र सुस्थितीत आहे की नाही, याची पडताळणी करून मान्सूनच्या पुर्वी सदर यंत्र दुरुस्त करून घ्यावे. याबाबत तहसीलदारांनी गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहायक आणि स्कायमेटच्या प्रतिनिधींची तालुका स्तरावर बैठक घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिका-यांनी दिल्या.

जिल्ह्यात प्रधानमंत्री सन्मान निधीकरीता 2 लक्ष 49 हजार 26 शेतकरी पात्र असून यापैकी 2 लक्ष 42 हजार 697 लाभार्थ्यांचे ई-केवायसी पूर्ण झाले आहेत. तर 6329 लाभार्थ्यांचे प्रलंबित आहे. तसेच 2 लक्ष 44 हजार 892  लाभार्थी शेतक-यांचे आधार सिडींग पूर्ण झाले आहेत. तर 6765 शेतक-यांचे आधार सिडींग करणे बाकी असून 581 शेतक-यांची पडताळणी प्रलंबित आहे, अशी माहिती जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार यांनी दिली.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in